cmyk

## संपादकीय

### निवडणूक आयोगालाच जबाबदारी घ्यावी लागेल

निवडणूक प्रक्रियेचे पावित्र्य राखा, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी निवडणूक आयोगाला फटकारले तसेच 'व्हीव्हीपॅट' यंत्रणा असलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा (ईव्हीएम) वापर करून केलेल्या मतदानाची पडताळणी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवरील निकाल राखून ठेवला. ईव्हीएम वापरून केल्या जाणाऱ्या मतदानात गैरप्रकार होत असल्याचा संशय आल्याने 'असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स' या स्वयंसेवी संस्थेने ईव्हीएममधील मतदान

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### पहिल्या टप्प्यातील मतदान घटले

नवी दिल्ली : देशात लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याचे मतदान पार पडले. गेल्यावेळी म्हणजे २०१९ मध्ये झालेल्या निवडणुकीत पहिल्या टप्प्यात ९१ जागांवर मतदान झाले होते. त्यासाठी ६९.५८ टक्के मतदान झाले होते. यावेळी १०२ जागांवर मतदान झाले. मात्र, मतदान घटून ६० टक्क्यांवर आले आहे. दरम्यान, वेगळ्या राज्याच्या मागणीसाठी ईस्टर्न नागालँड पीपल्स ऑर्गनायझेशन(ईनपीओ) या राज्यातील सात आदिवासी संघटनांच्या शिखर संस्थेने अनिश्चित काळासाठी पुकारलेल्या बंदमुळे शुक्रवारी पूर्व नागालँडमधील सहा जिल्ह्यांतील मतदान केंद्रावर शुकशुकाट बघायला मिळाला. सहा जिल्ह्यांतील ७३८ मतदान केंद्रांवर निवडणूक अधिकारी तैनात करण्यात आले होते. तेथे नंतरही मतदान झाले नाही.

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–११ रविवार दि.२१ एप्रिल २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

# पंकजाताई, बीडचा शेतकरी हिसाब विचारतोय!

## मंत्री असताना ही १० कामे केली असती तर जिल्ह्यात विकासाची गंगा आली असती

विशेष प्रतिनिधी/बीड

स्व. गोपीनाथ मुंडे यांची कन्या आणि राजकीय वारसदार म्हणून खरच पंकजा मुंडे यांनी मंत्री असताना बीड व मराठवाड्यासाठी काही तरी केले आहे का?, पाच वर्ष मंत्री असताना त्यांनी बीड जिल्ह्यात एखादा औद्योगिक, शेतीविषयक असा प्रकल्प आणला आहे का?, बेरोजगारी कमी व्हावी यासाठी वेगळे असे काही केले का? २० वर्ष झाले तरी भीमी–कृष्णा स्थिरीकरण प्रकल्पातून उजनीतून बीडला पाणी का आणता आले नाही, काही प्रयत्न केले का?, बीडला रेल्वेच्या नकाशावर आणण्याचे मुंडे साहेबांचे स्वप्न पुर्ण करता का आले नाही?, ऊसतोड मजुरांच्या हातातील कोयता कायम हातीच रहावा का? दक्षिण–उत्तर रेल्वे मार्गाकडे दुर्लक्ष का झाले?, सिंचन क्षेत्र वाढवण्यासाठी एक तरी प्रकल्प आणला का? पुर्व बीड जिल्ह्याचा आर्थिक कणा असलेला वैद्यनाथ साखर कारखाना बंद का ठेवला? एक नव्हे असे अनेक प्रश्न



पाच वर्षाच्या मंत्रीपदाच्या कार्यकाळात पंकजा मुंडे यांना सोडवता आले असते, मात्र तसे झाले नाही. त्यामुळे बीड के विकास का दो हिसाब, अशी सामान्य नागरीकांवर म्हणण्याची वेळ आली आहे.

महाराष्ट्राच्या प्रबळ सत्तास्थानांबद्दल जेंव्हा चर्चा केली जाते तेंव्हा बीड जिल्ह्यातील नेतृत्वाची नेहमी चर्चा केली जाईल. एकेकाळी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्यासारख्या लढवय्या आणि निस्पृह नेतृत्वाला संसदेत निवडून पाठविणारा हा बीड जिल्हा काही काळ शेतकरी, कामगार आणि कष्टकऱ्यांच्या राजकारणाला मुख्य प्रवाहात आणणारा जिल्हा म्हणूनही ओळखला जात होता. साधारणतः ऐंशीच्या दशकात महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर गोपीनाथ मुंडे यांचा उदय झाला आणि येथील समिकरणे बदलून गेली. गोपीनाथ मुंडे नावाच्या वादळाच्या झंझावातात काँग्रेससह इतर प्रस्थापित पक्षांच्या मूळांना जबरदस्त हादरे बसले. भाजपाच्या माधवं या सुत्राच्या भरभराटीचा हा काळ होता. माळी–धनगर–वंजारी या तीन जातींची मोट बांधून गोपीनाथ मुंडे आणि प्रमोद महाजन या जोडीने मराठवाड्यात भाजपाच्या राजकारणाची सुरुवात केली. बघता बघता या राजकारणाने वटवृक्षाचे रुप धारण केले आणि मराठवाड्यासह राज्याचे नेतृत्त्व म्हणून गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वाचा उदय झाला. आज २०२४ साल आहे आणि गोपीनाथ मुंडे यांच्या निधनाना १० वर्षे होत आहेत. अशावेळी त्यांच्या पश्चात त्यांच्या वारस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माजी मंत्री पंकजा मुंडे यांनी खरोखरच त्यांचा वारसा पुढे चालविला का? किंवा त्या मराठवाड्याच्या ◀◀ पान २ वर

### मंत्री होतात, बीड जिल्ह्याच्या जिव्हाळ्याचं हे का केलं नाही?

- » सत्तेत आसताना बीड जिल्ह्यात एकही मोठा उद्योग का आणता आला नाही?
- » सिंचन क्षेत्र वाढेल असा एकही प्रकल्प का केला नाही?
- » वर्षानुवर्षे झाले तरी ऊसतोड मजुरांच्या हातातील कोयता का सुटत नाही?
- » २० वर्षानंतरही भीमा–कृष्णा स्थिरीकरण प्रकल्पाद्वारे उजनीतून बीडला पाणी का मिळाले नाही?
- » रेल्वेच्या नकाशावर बीडला आणण्याचे मुंडे साहेबांचे स्वप्न पुर्ण का करता आले नाही?
- » दक्षिण–उत्तर या रेल्वेमार्गाकडे दुर्लक्ष का झाले?
- » माळी–धनगर–वंजारी यांच्यासाठी ठोस असे काही तरी का करता आले नाही?
- » बीड जिल्ह्यातील तरुणांमधील बेरोजगारी कमी करण्यासाठी काहीच करता का आले नाही?
- » पुर्व बीड जिल्ह्याचा आर्थिक कणा असलेला वैद्यनाथ साखर कारखाना चालवण्यात अपयश का आले?
- » शेतकऱ्यांसाठी ठोस असा एखादा तरी प्रकल्प बीड जिल्ह्यात का आणला नाही?

# गल्ली ते दिल्ली तुतारी वाजणार–बजरंग सोनवणे

## २२ एप्रिल ला भरणार अर्ज ,आघाडीच्या पत्रकार परिषदेत गुलालाची मूठ एकवटली



बीड । प्रतिनिधी

लोकसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीने एकजुटीने काम करण्यासाठी वजन बांधली आहे त्यामुळे बीड लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचा विजय कोणी रोखू शकणार नाही असे मत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केले आहे बीड लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी कालपासून अधिसूचना काढण्यात आलेली आहे २२ एप्रिल रोजी महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून बजरंग सोनवणे हे उमेदवारी भरणार आहेत याबाबत सविस्तर माहिती देण्यासाठी महाविकास आघाडीतल्या घटक पक्षांनी व स्थानिक स्तरावर महाविकास आघाडीला पाठिंबा देणाऱ्या संघटनांच्या प्रमुख नेत्यांची पत्रकार परिषद संपन्न झाली राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आमदार संदीप क्षीरसागर ◀◀ पान २ वर

### ठळक मुद्दे..

- शिवसेना डीपीआय कम्युनिष्ट शेकाप शेतकरी संघटना आप कडून बूथ युथ बांधणी
- संविधान वाचवायचे तर कमळ हरवा अजिंक्य चांदणे
- उद्धव साहेबांचा आदेश आला तुतारी जिंकणार
- शिवसेना लढाई लोकशाहीची कॉ नामदेव चव्हाण
- गावागावात जाऊ बुरांडे
- शरद पवारानी महिला सक्षमीकरण केले उषा दराडे

# डॉ.ज्योती मेटेंची लोकसभा निवडणुकीतून माघार

## पत्रकार परिषदेत केले जाहीर; शिवसंग्राम प्रचार कोणाचा करणार?



बीड । प्रतिनिधी

समाजासाठी माझं कुंकू गमावले आहे. हे कोणत्याही शब्दात मांडता येणारे नाही. जनतेचा स्वाभीमान जपावा म्हणून मी लोकसभा लढवावी अशी मागणी होती. त्यामुळे मी शासकिय नोकरीतून सेवानिवृत्ती घेतली. मात्र उमेदवारी न मिळाल्यानंतर मी जनतेशी संवाद साधला. त्यातून समाजहित सर्वात महत्वाचे हे स्पष्ट झाले. लौकीक ◀◀ पान २ वर

### शिवसंग्रामच्या व्यासपीठावर क्रांती मोर्चाचे तीन समन्वयक

शिवसंग्राम व ज्योती मेटे या आपली निवडणुकीबाबत भुमिका जाहीर करणार होत्या. त्यामुळे त्यांचेच पदाधिकारी तेथे असतील असे सर्वांना वाटले होते. मात्र यावेळी मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक ॲड. मंगेश पोकळे, सी.ए. जाधव आणि डॉ. प्रमोद शिंदे हेही उपस्थित होते. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या.

# पाटोदा ते साकत रस्त्याचे काम मान्सूनपूर्वी करा

### सामाजिक कार्यकर्ते सज्जाद सय्यद यांची मागणी

बीड । प्रतिनिधी

पाटोदा शहरातून जाणारा व नगर जिल्ह्याला जोडणारा पाटोदा– साकत मार्गे जामखेड हा जाणारा रस्ता पाटोदा पासून सात किलोमीटर पर्यंत बीड जिल्ह्याच्या हद्दीपर्यंत हा रस्ता अत्यंत खराब दर्जाचा झाला असल्यामुळे शासनाने या रस्त्यावर आर्थिक तरतूद करून हा रस्ता नवीन करण्यासाठी मंजुरी दिलेली आहे .परंतु मधील काळात या रस्त्याच्या साईड पट्ट्या भरण्यात आलेल्या आहेत. या रस्त्याने वाहतूक जास्त ◀◀ पान २ वर

# लोकसभा निवडणुकीच्या काळात सभा, रॅलीच्या अर्जावर ३ दिवसांत निर्णय घ्या

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**लोकसभा निवडणुकीच्या काळात सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमाच्या अर्जावर अर्ज प्राप्त झाल्यापासून ३ दिवसांत निर्णय घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. निवडणुकीच्या नावावर सार्वजनिक सभा, निदर्शने, रॅली परवानगीशिवाय काढण्यास प्रतिबंध करणारे आदेश सीआरपीसी १४४ अंतर्गत देशभरात जारी करण्यात आले आहेत.**

या आदेशाला आव्हान देणारी जनहित याचिका अरुणा रॉय व निखिल डे यांनी दाखल केली आहे. त्यांनी मतदार जागृतीसाठी ◀◀ पान २ वर



# सुरेश धस यांच्यावर आरोपपत्र दाखल

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील बेकायदेशीररीत्या मंदिर व मस्जिद जमीन हस्तांतरण प्रकरणात माजी मंत्री सुरेश धस व इतरांवर दाखल झालेल्या गुन्ह्यामध्ये सात आरोपपत्र दाखल करण्यात आल्याची माहिती तपास अधिकाऱ्यांनी उच्च न्यायालयामध्ये सादर केली.

बीड जिल्ह्यातील विशेषत: आष्टी येथील अनेक देवस्थानांच्या जमिनी बेकायदेशीररीत्या हस्तांतरित केल्यासंदर्भात राम खाडे यांनी दाखल केलेल्या याचिकेमध्ये सुरेश ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१९ एप्रिल २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू : ५७.०० क्विंटल | | |
| २,२५१ | ३,१५० | २,५५३ |
| ज्वारी/हायब्रिड : २४५.०० क्विंटल | | |
| १,६०० | ३,२८० | २,६२४ |
| मूग : ०.५० क्विंटल | | |
| ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : ७२.५० क्विंटल | | |
| ९,००० | १०,९०० | १०,४८४ |
| उडीद : १.५० क्विंटल | | |
| ५,००० | ६,५०१ | ५,७५० |
| बाजरी: २३.०० क्विंटल | | |
| १,७६१ | २,७४० | २,४१३ |
| चिंचोका/लोकल: ८.०० क्विंटल | | |
| २,४०० | २,४०० | २,४०० |
| सोयाबीन: १२५.५० क्विंटल | | |
| ४,५५० | ४,६११ | ४,५८९ |
| हरभरा: १२.५० क्विंटल | | |
| ५,००० | ६,५०० | ५,७३७ |

# मराठवाड्यातील सिंचनाच्या प्रकल्पाला काँग्रेसचा खोडा

## नरेंद्र मोदी यांचा काँग्रेसवर आरोप

परभणी । प्रतिनिधी

**मराठवाड्यात जमिनीची सुपिकता असून वैभवशाली परंपरा लाभलेली आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने जलयुक्त शिवारच्या माध्यमातून सिंचनाच्या योजना राबविल्या. त्यानंतर मराठवाडा वॉटर ग्रीड या योजनेच्या माध्यमातून मराठवाड्यात सिंचनाचे प्रकल्प पूर्ण करण्याचा मानस आम्ही आखला होता. मात्र काँग्रेसने मराठवाड्यातील या योजनेला खोडा घालत या योजना बंद केल्या असल्याचा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परभणी येथील सभेत केला.**

महायुतीचे उमेदवार महादेव जानकर यांच्या प्रचारार्थ शनिवार, दि. २० एप्रिल रोजी आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर केंद्रीय मंत्री रामदास आठवले, केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री संजय बनसोडे, मंत्री अतुल साळवे, माजी मंत्री बबनराव लोणीकर, आ. मेघना बोर्डीकर, आ. रत्नाकर गुट्टे, आ. विक्रम काळे, राजेश विटेकर, प्रताप देशमुख, आनंद भरोसे, माजी आ.



रामप्रसाद बोर्डीकर, माजी खा. सुरेश जाधव, माजी आ. हरिभाऊ लहाने, संजय केनेकर, आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, काँग्रेस हा असा वेल आहे की ज्याला हा वेल लटकला जाईल त्याचा सर्वनाश झाल्याशिवाय राहत नाही, असा टोला त्यांनी शिवसेनेचे उध्दव ठाकरे व राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार यांना लगावला. पुढे बोलताना ते म्हणाले की, परभणी जिल्हा सोयाबीनचे कोठार म्हणून ओळखला जातो. यापुढे खाद्यतेल निर्मितीसाठी परभणीचे नाव समोर येईल. तसेच अमरावती येथे होत असलेल्या टेक्स्टाईल पार्कमुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांनाही याचा मोठा फायदा होणार असल्याचे ते म्हणाले. मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने जलयुक्त शिवार ही योजना राबविली. त्याचबरोबर मराठवाडा ग्रीड ही योजनाही असताना राज्यात आलेल्या महाविकास आघाडी सरकारने या सिंचनाच्या योजना थांबविण्याचे पाप केले असल्याचा आरोप त्यांनी केला. आता लवकरच मराठवाड्यातील सिंचनाचे सर्व प्रकल्प पूर्णत्वास जातील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी ते म्हणाले की, परभणीकरांचे स्वप्न म्हणजे माझा संकल्प राहणार असल्याचे तेहणाले. मराठवाड्यात रेल्वेमार्गाचे व विद्युतीकरण लवकरच पूर्ण होणार असून समृद्धी महामार्गाने परभणीला मुंबईशी जोडले जाणार आहे. आतापर्यंत केंद्र सरकारने लोकोपयोगी विविध योजना राबविल्या आहेत. या योजनांचा फायदा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचत असल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले.

# अशोक चव्हाणांना तुरुंगात टाकण्याचे आश्वासन पंतप्रधान पाळतील का?

## काँग्रेसचा नरेंद्र मोदींना सवाल

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भाजपचे राज्यसभा खासदार अशोक चव्हाण यांना तुरुंगात टाकण्याचे आश्वासन पंतप्रधान पाळतील का? असा सवाल काँग्रेसने पंतप्रधान नरेंद्र मोदींना केला. शनिवारी ( दि. २०) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महाराष्ट्रातील नांदेड आणि परभणी येथे प्रचारसभा संपन्न झाली. याच सभेच्या अनुषंगाने काँग्रेसने एक्सवर पोस्ट लिहून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना काही प्रश्न विचारले आहेत.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी मराठवाडा दौऱ्यावर होते. पंतप्रधानांनी नांदेड आणि परभणी या दोन ठिकाणी प्रचारसभांना संबोधित केले. या प्रचारसभेत खा. अशोक चव्हाणही मंचावर उपस्थित होते. अशोक चव्हाण यांनी काँग्रेस सोडून भाजपमध्ये प्रवेश केल्यावर त्यांना लगेच भाजपने राज्यसभेवर पाठवले. याच गोष्टीवरुन निशाणा साधताना काँग्रेसचे माध्यम सरचिटणीस जयराम रमेश यांनी पंतप्रधानांना एक्सवर पोस्ट



लिहून तीन प्रश्न विचारले. त्यामुळे एकेकाळी काँग्रेसचे दिग्गज नेते राहिलेल्या नेत्यांनी भ्रष्टाचार केला, ही गोष्ट काँग्रेस स्वीकारत आहेत की काय असा सवालही उपस्थित होतो.

जयराम रमेश यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, ''पंतप्रधानांनी ३० मार्च २०१४ मध्ये नांदेडमध्ये दिलेल्या भाषणात अशोक चव्हाणांवर जोरदार टीका केली होती. पंतप्रधान झालो तर अशोक चव्हाण यांना सहा महिन्यांत तुरुंगात पाठवू, असे मोदी म्हणाले होते. एका दशकानंतरही चव्हाण तुरुंगात नाहीत, चौकशी सुरू आहे आणि ते ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# निवडणूक आयोगालाच जबाबदारी घ्यावी लागेल

निवडणूक प्रक्रियेचे पावित्र्य राखा, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी निवडणूक आयोगाला फटकारले तसेच 'व्हीव्हीपॅट' यंत्रणा असलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा (ईव्हीएम) वापर करून केलेल्या मतदानाची पडताळणी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवरील निकाल राखून ठेवला. ईव्हीएम वापरून केल्या जाणाऱ्या मतदानात गैरप्रकार होत असल्याचा संशय आल्याने 'असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स' या स्वयंसेवी संस्थेने ईव्हीएममधील मतदान आणि 'व्हीव्हीपॅट स्लिप्स' यांची १०० टक्के पडताळणी करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती.

या प्रकरणी गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांतर्फे ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण आणि गोपाल शंकरनारायणन यांनी बाजू मांडली. याचिकाकर्त्यांनी व्हीव्हीपॅट मशिनवरील पारदर्शक काचेच्या जागी एक अपारदर्शक काच लावण्याचा निवडणूक आयोगाचा २०१७ चा निर्णय मागे घेण्याची मागणी केली आहे. या यंत्रणेद्वारे मतदार फक्त सात सेकंदांसाठी प्रकाश चालू असतानाच व्हीव्हीपॅट स्लिप पाहू शकतो. याचिकाकर्त्यांच्या या मागणीवर खंडपीठाने निवडणूक आयोगाला ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट यंत्रणा कशी काम करते, ते स्पष्ट करण्यास सांगितले. त्यानुसार आयोगातर्फे ज्येष्ठ वकील मनिंदर सिंग यांनी ईव्हीएम कसे कार्य करते याची प्रक्रिया स्पष्ट केली. त्यावर न्या. दत्ता यांनी ही निवडणूक प्रक्रिया आहे, तिचे पावित्र्य राखले पाहिजे, असे मत व्यक्त केले. ज्या गोष्टी होणे अपेक्षित आहे त्या होत नाहीत अशी भीती कोणाच्याही मनात असता कामा नये असेही ते म्हणाले.

खंडपीठाने व्हीव्हीपॅटच्या सर्व कागदी पावत्यांची मोजणी करता येऊ शकेल का असा प्रश्न उपस्थित केला तेव्हा प्रत्येक कागदी पावती मोजणीसाठी नाही. त्यांचा आकारही लहान असून त्या चिकट असल्याने एका व्हीव्हीपॅट यंत्रामधील कागदी पावत्या मोजण्यासाठी पाच तास लागतात अशी माहिती आयोगाने दिली. सुनावणी दरम्यान खंडपीठाने अनेक प्रश्न विचारले. मतदारांना त्यांनी कोणाला मतदान केले याची पावती देता येऊ शकते का असा सवाल केला. त्यावर उत्तर देताना आयोगाने हे शक्य असले तरी त्यामुळे मतदान प्रक्रियेच्या गोपनीयतेचा भंग होण्याची भीती व्यक्त केली. मतदार पावती बाहेर घेऊन गेल्यानंतर त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागू शकतो. या पावतीचा लोक कसा उपयोग करतील ते सांगता येणार नाही असेही आयोग म्हणाले. सर्व युक्तिवाद ऐकल्यानंतर खंडपीठाने मुख्य मुद्दा हा मतदारांचा सगळ्या प्रक्रियेवर विश्वास बसण्याचा असल्याचे स्पष्ट केले. तसेच सर्व गोष्टींवर संशय घेणे योग्य नाही. जर निवडणूक आयोगाने काही चांगले काम केले असेल तर त्यांचे कौतुक करा असे याचिकाकर्त्यांना उद्देशून म्हटले. मतपत्रिकांमध्ये मोठ्या त्रुटी आहेत आणि आम्हाला त्याचा विचार करायचा नाही. त्याऐवजी भविष्यात राजकीय पक्षांसाठी बारकोड पद्धत वापरण्यासंबंधी आम्ही विचार करत आहोत असेही न्यायालय म्हणाले. जगातील सर्वात मोठा लोकशाही देश असलेल्या भारतात निवडणुकीची यंत्रणा पुन्हा एकदा इलेक्ट्रॉनिक्स व्होटिंग मशिनपासून पूर्वीच्या कागदी मतदान प्रक्रियेकडे वळवता येणार नाही असे मत सर्वोच्च न्यायालयाने एका सुनावणीदरम्यान व्यक्त केले होते परंतु 'ईव्हीएम'बाबत संशय निर्माण करणारे जे विविध मुद्दे उपस्थित झाले आहेत त्याची दखल सरकारला आणि निवडणूक आयोगाला घेऊन त्याबाबतचे संशय दूर करावे लागतील असेही म्हटले आहे. एका खासगी संस्थेने 'ईव्हीएम' च्या विरोधात जी याचिका दाखल केली आहे त्याची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे. गुरुवारी सुनावणी दरम्यान न्यायालयाने स्पष्टपणे ईव्हीएम यंत्रणा रद्द करून कागदी मतदान प्रक्रिया सुरू करण्याच्या मागणीला विरोध दर्शविला. जी यंत्रणा अस्तित्वात आहे तीच अधिक सक्षमपणे आणि संशयरहित कशी करता येईल याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. सध्याच्या नियमाप्रमाणे एका विधानसभा मतदारसंघामध्ये पाच व्हीव्हीपॅट यंत्रांमधील मतांची मोजणी केली जाते.

अशा प्रकारची पडताळणी शंभर टक्के केली जावी, अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली आहे. निवडणूक आयोगाच्या म्हणण्याप्रमाणे जर अशा प्रकारे शंभर टक्के पडताळणी करायची असेल तर बारा दिवस मतमोजणी करावी लागेल. याचिकाकर्त्यांचे वकील प्रशांत भूषण यांनी युरोपमधील जर्मनीसारख्या अनेक देशांनी ईव्हीएम बंद करून पुन्हा एकदा कागदी मतदानप्रक्रिया सुरू केल्याचा दाखला दिला. पण न्यायालयाने हा दाखला फेटाळताना जर्मनी हा खूप छोटा देश असल्यामुळे त्यांना या प्रकारे बदल करणे सहज शक्य आहे असे म्हटले. भारतासारख्या मोठ्या लोकशाही देशात एखाद्या यंत्रणेमध्ये मूलभूत बदल करणे अवघड ठरू शकते असे खंडपीठाने म्हटले आहे. भारतामध्ये इलेक्ट्रॉनिक्स व्होटिंग मशिन आणि व्हीव्हीपॅट ही यंत्रे ज्या कंपनीमध्ये तयार करण्यात येतात त्या सरकारी कंपन्यांमध्ये भाजपचे काही पदाधिकारी संचालक म्हणून काम करत असल्याचा दावाही सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांनी केला. पण खंडपीठाने त्या विषयाची दखल घेऊन अशा प्रकारची यंत्रनिर्मिती सरकारी कंपन्यांमध्येच होणे महत्त्वाचे आहे.

खासगी कंपन्यांमध्ये जर हे काम दिले गेले तर तुम्ही पुन्हा आक्षेप घेऊ शकता याची जाणीव करून दिली. खंडपीठाने ईव्हीएम यंत्रणा राहणारच असे सांगून त्यामध्ये सुधारणा कशी करता येईल याबाबतच्या सूचना करण्याचे आवाहन केले. या सर्व प्रक्रियेमध्ये पारदर्शकता कशी येईल आणि मतदाराने ज्या उमेदवारासमोरचे बटन दाबले आहे त्या उमेदवारालाच मतदान झालेले आहे याची खात्री मतदाराला होईल हे पाहण्याची जबाबदारी आता निवडणूक आयोगाला घ्यावी लागेल. ईव्हीएम किंवा व्हीव्हीपॅट यंत्रामध्ये एक इलेक्ट्रॉनिक चीप असल्यामुळे त्याची छेडछाड करणे शक्य असल्याचा दावा करण्यात आला होता परंतु खंडपीठाने त्याला महत्त्व दिले नाही. अद्यापही ईव्हीएमबाबतच्या संशयाला पूर्णविराम मिळाला नसल्याने विनाकारण लोकशाही प्रक्रियेबाबत संशय निर्माण होत आहे. या सर्व प्रक्रियेमध्ये पारदर्शकता कशी आणता येईल याचा विचार निवडणूक आयोगाला करावा लागेल.

# धारूर नगरपालिका अंतर्गत अग्निशामक सेवा सप्ताह

## अग्नी सुरक्षा सुनिश्चित करा राष्ट्र उभारणीत योगदान भरा

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

**धारूर नगरपालिकेत महाराष्ट्र अग्निशामक सेवा संचालक एस एस वारीक यांच्या आदेशाने महाराष्ट्रात १४ ते २० एप्रिल अग्निशामक सेवा सप्ताह चे आयोजन करण्यात आले होते. याच अनुषंगाने धारुर नगरपालिकेतही अग्निशामक सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते यात तालुका शहरांमध्ये जनजागृती करून सप्ताह संपन्न केला.**

धारूर नगरपालिकेमध्ये महाराष्ट्र अग्निशामक सेवा संचालक एस एस वारीक यांच्या आदेशाने १४ ते २० एप्रिल दरम्यान आग्नि शामक सेवा सप्ताहचे आयोजन मुख्याधिकारी महेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. १४ एप्रिल १९४४ रोजी मुंबई येथील गोदीत एस एस फोर्ट स्टिकिंग या जहाजाला स्फोट होऊन लागलेल्या भीषण आगीत झुंज देताना अग्निशामक दलाच्या ६६ जवानांना हुतात्मे प्राप्त झाले होते.तसेच त्यानंतरही अग्निशामक कार्यकरत असताना जे हुतात्मे झालेले अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या स्मृती प्रित्यर्थ तसेच जनतेमध्ये जनजागृती निर्माण होण्यासाठी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी केंद्रीय गृहमंत्री नवी दिल्ली यांच्या सूचनेने सर्व देशभरात अग्निशामक सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. यामध्ये धारूर नगरपालिका अंतर्गत मुख्याधिकारी महेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली १४ एप्रिल ते २० एप्रिल दरम्यान अग्निशामक सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यात विविध भागामध्ये अग्निशामक वाहन व तेथील कर्मचारी यांनी शहरांमध्ये जनजागृती करण्याचे काम करण्यात आले. यामध्ये केंद्रीय गृहमंत्री कार्यालयाने घोषवाक्य दिलेले "अग्नि सुरक्षा सुनिश्चित करा राष्ट्र उभारणीत योगदान भरा" याचा नारा देत अग्निशामक सेवा सप्ताह २० एप्रिल शनिवार रोजी धारूर येथील बस स्थानक येथे सप्ताहाचा शेवट करण्यात आला. यावेळी प्रवासी, बस चालक - वाहक नागरिक आधीच्या उपस्थितीमध्ये आग लागल्यानंतर सुरक्षेसाठी काय करायचे यासाठी उपस्थितांना सांगण्यात आले.तसेच आगीचा काही अपघात झाल्यास संपर्क करण्यासाठी यावेळी नगरपालिकेच्या अग्निशामक कर्मचाऱ्यांनी नागरिकांना आव्हानही केले. यावेळी अग्निशामक दलाचे बालाजी शिनगारे, विकास गायसमुद्रे, तसेच आगारातील वाहक, चालक, कर्मचारी, प्रवासी, नागरिक, पत्रकार उपस्थित होते.

# केजरीवालांना तुरुंगात मारण्याचा प्रयत्न – आपचा गंभीर आरोप

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना तिहारच्या तुरुंगात हळूहळू मारण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप आपचे नेते सौरव भारद्वाज यांनी केला. दिल्लीत शनिवारी (२० एप्रिल) पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. अरविंद केजरीवाल यांनी तुरुंगात इन्सुलिन आणि दररोज डॉक्टरांचा सल्ला मिळावा, अशी मागणी केली होती. या मागणीचा निकाल दिल्लीच्या राऊज अव्हेन्यू न्यायालयाने राखीव ठेवला. त्यानंतर सौरव भारद्वाज यांनी हा आरोप केला आहे.

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल मद्य धोरण गैरव्यवहारप्रकरणी तिहार तुरुंगात आहेत. त्यांना तुरुंगात घरचे जेवण करण्याची परवानगी मिळाली. त्यामुळे ते तुरुंगातही घरचे जेवण करतात. यादरम्यान ईडीने त्यांच्यावर आरोप केले होते की, "केजरीवाल रक्तातील साखर वाढण्यासाठी तुरुंगात आंबे आणि मिठाई खातात." ईडीच्या या आरोपानंतर आपचे नेते चांगलेच आक्रमक झाले आहेत. केजरीवाल यांनी शुक्रवारी (१९ एप्रिल) रोजी तुरुंगात इन्सुलिन आणि दूरदृश्यप्रणालीद्वारे डॉक्टरांशी सल्लामसलत करण्याची मागणी न्यायालयाकडे केली. या सुनावणीचा निकाल दिल्लीच्या राऊज अव्हेन्यू न्यायालयाने राखून ठेवला आहे. त्यामुळे केजरीवाल यांनी मधुमेहाचा त्रास असून त्यांना तुरुंगात इन्सुलिन आणि डॉक्टरांचा सल्लाही मिळत नसल्याची भावना आपच्या नेत्यांची झाली. पत्रकार परिषदेत आपचे नेते सौरव भारद्वाज म्हणाले की, "तिहार तुरुंगात केजरीवाल यांना हळू हळूहळू मारण्याचे षडयंत्र आहे, उच्च मधुमेहाच्या रुग्णाला औषध नाही मिळाले तर शरीराचे अवयव खराब होण्याची भीती असते. अरविंद केजरीवाल यांच्यासोबतही असे होऊ शकते, असे झाले तर नायब राज्यपाल विनय सक्सेना किडनी देणार नाहीत." त्याचबरोबर भारद्वाज यांनी केजरीवालांच्या रक्तातील साखरेचे प्रमाण सतत वाढत असल्याचे अहवालही वाचून दाखवले.

# लोकशाहीसाठी ही निवडणूक महत्त्वाची–शरद पवार

**जालना । वृतसंस्था**

**सध्या देशाची वाटचाल हुकुमशाही कडे चालू आहे. ही हुकूमशाही आपली लोकशाही उद्धवस्त करेल, त्याला उत्तर द्यावं लागेल. ही निवडणूक लोकशाही टिकवण्याकरिता महत्त्वाची आहे, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी दिला.**



महाविकास आघाडीकडून जालना लोकसभेसाठी डॉ. कल्याण काळे आणि छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) लोकसभेसाठी चंद्रकांत खैरे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. महाविकास आघाडीची सभा श्रीहरी पॅव्हेलियन येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी सभेला संबोधित करताना शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर हल्लाबोल केला. शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, इंडिया आघाडीस अनेक पक्ष साथ देत आहेत. आम्ही सर्व पक्ष मिळून या लोकसभा निवडणुकीला सामोरे जात आहोत. देशात लोकांना बदल पाहिजे, असं लक्षात येतंय. त्यामुळेच छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) चंद्रकांत खैरे आणि जालना लोकसभेसाठी डॉ. कल्याण काळे या दोघांना निवडून आणण्याची जबाबदारी आपली आहे, असे आवाहनही यावेळी केले. पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, मोदी हे देशाचे पंतप्रधान नव्हे तर केवळ भाजपाचे पंतप्रधान आहेत. त्यांच्याकडे राष्ट्रीय दृष्टिकोण नाही. तुम्ही देशासाठी काय करणार हे सांगितलं पाहिजे. मात्र ते सतत टीका करण्यात वेळ घालवत आहेत. माजी पंतप्रधान पंडित नेहरुंवर टीका करणाऱ्या पंतप्रधानांची मानसिकता ओळखा. महागाई कमी करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र यांना महागाई कमी करता आली नाही, गॅस आणि पेट्रोल डिझेलच्या किमतीत वाढ झाली अशी टीकाही यावेळी केली. शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, इथं येण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे भाषण ऐकत होतो. पंतप्रधान हे देशाचे असतात, मात्र भाषण ऐकल्यावर असे वाटले की ते भाजपाचे पंतप्रधान आहेत त्यांनी राष्ट्रीय दृष्टीकोन ठेवला पाहिजे. त्यांच्याकडून कधी नेहरू, कधी राहुल गांधींवर टीका करणं सुरूच आहे. तुम्ही देशाचे पंतप्रधान आहात तर तुम्ही काय केलं ते आधी सांगितलं पाहिजे. माझ्या हातात सत्ता द्या ५० दिवसात महागाई कमी करू म्हणाले होते, पण महागाई कमी करण्याऐवजी ती वाढली आहे. जीवनाश्यक वस्तूंच्या किमतीमध्ये मोठी वाढ झाली आहे. देशात बेरोजगारांची संख्या वाढल्याचेही यावेळी सांगितले.

# पान १वरून...

## पंकजाताई, बीड के

नेत्या म्हणून स्थापित होऊ शकल्या का? याची चर्चा करणे क्रमप्राप्त ठरते. स्व. गोपीनाथ मुंडे यांच्यानंतर परळी विधानसभा मतदारसंघातून पंकजा या बहुमताने निवडून आल्या. तर गोपीनाथरावांच्या मृत्युमुळे रिक्त झालेल्या जागेवर प्रीतम मुंडे या लोकसभेवर निवडून गेल्या. एका अर्थाने पंकजा मुंडे यांच्या दृष्टीने ही पहिली वर्षे ही अपार शक्तीची होती. गोपीनाथ मुंडे यांच्या कन्या म्हणून लाभलेली प्रचंड मोठी सहानुभूती, राज्य मंत्रीमंडळात महत्वाचे मंत्रीपद, सर्वात महत्वाचे म्हणजे केवळ मतदारसंघच नाही तर राज्य भाजपाचे नेत्या म्हणून पक्षसंघटनेतील महत्वाची जागा व त्याला जोडीस जोड म्हणून केंद्र आणि राज्यात भाजपाची पुर्ण बहुमतातील सत्ता अशी प्रचंड शक्ती त्यांच्या पाठीशी होती. त्यामुळे त्या मराठवाड्यातील एक आश्वासक नेत्या म्हणून स्वतःच्या हिंमतीवर प्रस्थापित होतील आणि परिसरातील अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लागतील अशी एक आशा होती. पण प्रत्यक्षात तसे झाले का? याचा हा आढावा घेऊयात. मराठवाड्यात सध्या सर्वात मोठा प्रश्न शाश्वत रोजगाराचा आहे. या भागातील बहुतांश रोजगार हे शेतीक्षेत्रात आहेत. परंतु शेतीक्षेत्राची देखील दूरवस्था झाल्यामुळे येथील रोजगाराचा आलेख देखील घसरला. परिणामी शहरांकडे स्थलांतर वाढले आहे. पुणे, मुंबई, औरंगाबाद किंवा तत्सम शहरांमध्ये रोजगाराच्या शोधार्थ येणाऱ्या जनतेमध्ये सर्वाधिक परिणाम हे मराठवाड्यातील आहे, हे वास्तव नाकारता येणार नाही. साधारणपणे ८३ टक्के युवकांच्या हाताला काम नसल्याचे आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (आयएलओ) आणि मनुष्यबळ विकास संस्था (आयएचडी) यांनी प्रकाशित केलेल्या 'भारतीय रोजगार अहवाल-२०२४' यातून उघड झाली आहे. हा काळ सन २००० ते २०२२ पर्यंतचा काळ आहे. या काळात बेरोजगार युवकांची संख्या दुप्पट झाली. हे प्रमाण अगोदर ३५.२ टक्के इतके होते, ते थेट ६५.७ टक्क्यांवर पोचले आहे. हायस्कुलपर्यंतचे शिक्षण घेतल्यानंतर शाळा सोडल्याचे प्रमाण वाढले आहे. हि जनसंख्या एकतर मराठवाड्यातील ऊस तोडणीच्या कामात जुंपली जाऊन शोषण व्यवस्थेच्या शिकार होतात. पंकजा मुंडे यांना आपल्या अपार सत्तेच्या काळात बेरोजगारीचा हा दर काही प्रमाणात कमी करणे शक्य होते. यासाठी आवश्यक असणाऱ्या उपाययोजनांमध्ये रोजगार निर्मीती करणारे उद्योग आणणे, जेमतेम दहा टक्क्यांच्या आसपास असणारी सिंचनाची क्षमता वाढविणे आहे त्या उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देणे, कौशल्य प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांच्या माध्यमातून कौशल्ये असणारे कामगार निर्माण करणारा भाग अशी मराठवाड्याची ओळख करता येणे शक्य असते. जालन्यासारख्या स्टील उत्पादनासाठी ओळखल्या जाणाऱ्या जिल्ह्यात ड्रायपोर्ट उभारण्याची घोषणा झाली. पण त्याचे काम अतिशय संथगतीने सुरु आहे. याला जोडूनच लॉजिस्टीक पार्कचीही नवी घोषणा करण्यात आली पण दोन्हीपैकी एकासही अद्याप पुर्णविराम मिळालेला नाही. महाराष्ट्राच्या राजकारणाची नस बीड जिल्ह्याचा कल कुठे आहे यावरुन ओळखता येते. हा जिल्हा स्वतः पंकजा मुंडे यांचा आहे. बीड जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतींकडे उद्योगांनी पाठ फिरविलेली आहे. जिल्ह्यात रोजगाराच्या संधी नसल्याने मनुष्यबळाचे शहरांकडे पलायन होत आहे. अनेक कुटुंबे ऊसतोड मजूरीच्या पारंपरीक व्यवसायाकडे वळतात. त्यामुळे ऊसतोड मजूर कुटुंबांचे आरोग्य व शिक्षणविषयक अनेक प्रश्न वर्षानुवर्षे तसेच आहेत. हे प्रश्न प्रत्येक निवडणूकीच्या वेळी येतात पण त्याच्या मूळाशी जाऊन फारसे काही प्रयत्न होताना दिसत नाहीत. दुसरा मुद्दा सिंचनाचा आहे. बीड जिल्ह्याची सिंचम क्षमता मूळातच कमी असल्यामुळे भीमा-कृष्णा स्थिरीकरण प्रकल्पाद्वारे उजनीतून पाणी देण्याच्या निर्णयाला सुमारे वीस वर्षे झाली पण हा प्रकल्प अद्यापही मार्गी लागताना दिसत नाही. हा प्रकल्प आपल्या मंत्रीपदाच्या काळात मार्गी लावणे पंकजा यांना शक्य होते. परंतु याबाबत त्यांच्याकडून फारसे प्रयत्न झाल्याचे दिसले नाही. हा प्रकल्प मार्गी लागल्यास मोठे क्षेत्र ओलिताखाली येऊन शेतकरी सुखी होऊ शकतो. विशेष म्हणजे आता अलिकडे नाव बदललेल्या धाराशीव म्हणजेच उस्मानाबाद जिल्ह्यालाही याच प्रकल्पाची आस आहे. स्व. गोपीनाथ मुंडे हे जवळपास प्रत्येक निवडणूकीत परळी-बीड-नगर या रेल्वेमार्गाचा उल्लेख करीत असत. अगदी गेल्या निवडणूकीत देखील प्रीतम मुंडे यांनी हा मुद्दा पुन्हा मांडला. परंतु हा मार्ग अद्यापही अस्तित्वात आला नसून हा भाग अद्यापही रेल्वेच्या नकाशावर जोडणे शक्य झाले नाही. तसेच सोलापूर - तुळजापूर - धाराशिव - बीड - जालना - जळगाव - बुऱ्हाणपूर हा दक्षिण-उत्तर रेल्वेमार्ग व्हावा अशीही नागरीकांची मागणी आहे. परंतु यावरही काम झाले नाही. मराठवाड्याला रेल्वेच्या नकाशावर महत्वाचे स्थान मिळावे अशी गोपीनाथ मुंडे यांची इच्छा होती. ते बहुतांश काळ विरोधी बाकांवरच असल्यामुळे त्यांच्या या इच्छा फळाला आल्या नाहीत. पहिल्याच झटक्यात सत्ताधारी झालेल्या पंकजांना त्यांचे हे स्वप्न पुर्ण करता येणे शक्य होते.

महत्वाचा मुद्दा म्हणजे मराठवाड्यात शेतकरी आत्महत्यांचा मुद्दा बरीच वर्षांपासून चर्चेत आहे. पाण्याची प्रचंड टंचाई, कर्जबाजारीपणा आणि बेरोजगारी ही त्यामागील कारणे आहे. याला जोडून आणखी एक मोठा सामाजिक प्रश्न उभा ठाकला आहे तो म्हणजे गावखेड्यातील अविवाहित मुले. रोजगार आणि इतर अभावांच्या कारणांमुळे ही मुले लग्नाची वये उलटून गेली तरी अविवाहित आहेत. याची कारणे काही सामाजिक असली तरी ती बहुतांश राजकीय देखील आहे. या कारणांचा उलगडा करण्याची हिंमत पंकजा मुंडे यांनी केली नाही. गोपीनाथ मुंडे हे स्वभावतः बंडखोर होते. आपल्या बंडखोर वृत्तीमुळेच त्यांनी आपले एक स्वतःचे उपद्रवमूल्य तयार केले होते. त्याच्या उलट गेली पाच वर्षे चहुबाजूंनी दमन होत असतानाही पंकजा शांत होत्या. त्यांच्या शांततेमागचे गूढ काय असावे अशा चर्चा रंगल्या. पंकजांनी वडीलांच्या बंडखोरीचा वारसा पुढे चालविला असता तर कदाचित त्यांना त्याचा जास्त फायदा झाला असता. त्यांचे शांत राहणे, सत्तेशी जुळवून घेत राहणे हे पर्यायाने मराठवाड्याच्या जनतेसाठी देखील 'घाटे का सौदा' ठरला असे म्हणता येईल. म्हणूनच त्या नेतृत्वाच्या दृष्टीने गोपीनाथ मुंडेंच्या वारसदार ठरतात असे म्हणणे थोडे धाडसाचे ठरेल.

---------

## डॉ.ज्योती मेटेंची लोकसभा

अर्थाने विचार केला तर माझ्याकडे गमवायला आणि कमवायसाठी काही नाही, असे सांगत समाजाच्या मतांची विभागणी होऊ नये यासाठी आपण लोकसभा निवडणुक लढवत नसल्याचे शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योती मेटे यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केले. मात्र शिवसंग्राम व त्या स्वत: प्रचार कोणाचा करणार हे त्यांनी सांगणे टाळले. याबाबत लवकरच राज्यस्तरावरुन निर्णय घेतला जाणार असल्याचे त्या म्हणाल्या. शिवसंग्राम पक्षाच्या वतीने शनिवार, दि. २० एप्रिल रोजी शिवसंग्राम भवन येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. योवली पुढे डॉ. मेटे म्हणाल्या, लोकसभा २०२४ मध्ये मी लोकसभा लढवावी अशी मागणी जनतेतून झाली. सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करुन शासकिय सेवेतून सेवानिवृत्ती घेतली होती. त्यानुसार उमेदवारी मिळते का हे पाहिले. शिवसंग्रामतर्फे इतर पक्षांच्या मदतीने निवडणूक लढवण्याचा पर्याय खुला होता. हा पर्याय आजमावून पाहिला. यात कोणात्याही दबाव किंवा प्रलोभनांना बळी न पडता मी माझ्या भूमिकेवर ठाम राहिलेली आहे. कारण समाज हितासाठी वैयक्तीक तडजोड न करणाऱ्या लोकनेते दिवंगत विनायकराव मेटे यांची मी पत्नी आहे, याची मी कायम जाण आणि भान बाळगलेले आहे. त्यामुळे बीड लोकसभा निवडणूक लढवत असतांना पुढे काय करायचेच हा प्रश्न जेंव्हा पुढे आला. अनेक बाबींची चाचपणी केली, चर्चा केली. ते करत असताना तो निर्णय माझ्या बाबतीत अनुकूल ठरला असता परंतु लोकभावनेचा आदर करुन ज्या समाज हितासाठी साहेबांनी कधीही तडजोड केली नाही आणि समाज हितासाठी मी माझं कुंकू गमावलेले आहे. तेंव्हा लौकीक अर्थाने विचार केला तर माझ्याकडे गमवायला आणि कमवायसाठी काही नाही. तसेच समाजाच्या मतांची विभागणी टाळण्यासाठी मी लोकसभा निवडणूक लढवणार नाही, असा निर्णय डॉ. ज्योती मेटे यांनी जाहिर केला. मात्र पुढे शिवसंग्रामची भुमिका काय असणार हे प्रदेश कार्याकारिणीची बैठक घेऊन जाहीर केली जाईल, असेह त्या म्हणाल्या. त्यामुळे मेटे व शिवसंग्राम बीडमध्ये पंकजा मुंडे यांचा की बजरंग सोनवणे यांचा प्रचार करणार याबाबत अद्याप संभ्रम आहे. यावेळी ज्येष्ठ नेते प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष नारायण काशीद, मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक अँड. मंगेश पोकळे, समन्वयक सी.ए. बी.बी. जाधव, समन्वयक डॉ. प्रमोद शिंदे, समन्वयक भास्कर गायकवाड, शिवसंग्रामचे जिल्हा सरचिटणीस अनील घुमरे, सरचिटणीस सुहास पाटील, प्रा. सुभाष जाधव, शिवसंग्राम छत्रपती संभाजीनगर येथील ज्येष्ठ नेते सलीम पटेल आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

--------------------

## गल्ली ते दिल्ली तुतारी

राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष राजसाहेब देशमुख शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर माजी आमदार सय्यद सलीम भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉम्रेड नामदेव चव्हाण मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते एडवोकेट अजय बुरांडे आप चे अध्यक्ष अशोक येडे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस बाळासाहेब घुमरे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे माजीआमदार उषाताई दराडे डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे वकील आघाडीच्या नेत्या हेमा पिंपळे राष्ट्रवादीचे नेते नवीदुज्जम्मा सय्यद भाई मोहन गुंड प्रा प्रशांत पवार आदी धन्यवाद नेते हजर होते यावेळी बोलताना बजरंग सोनवणे यांनी बीड लोकसभा मतदारसंघातील सर्व राजकीय व सामाजिक स्थिती पत्रकारांसमोर विशद केली रेल्वेचा प्रश्न आरक्षणाचा प्रश्न युवकांच्या बेरोजगारीचा प्रश्न महिलांच्या व मुलींच्या अनेक प्रश्नाबाबत विद्यमान नेतृत्व उदासीन आहे बीड जिल्ह्यातल्या सर्व जाती धर्मातल्या लोकांना परिवर्तनाची गरज वाटत असल्यामुळे माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यावर शरद पवार यांनी विश्वास व्यक्त केल्याचे त्यांनी सांगितले यावेळी बोलताना कॉम्रेड नामदेव चव्हाण यांनी देशातली एकाधिकारशाही व हुकूमशाही नष्ट करण्यासाठी आम्ही इंडियाच्या माध्यमातून महाविकास आघाडीत सामील झालेलो आहोत मार्क्सवादी कमिट पक्षाचा व भाकपाचा या जिल्ह्याला मोठा इतिहास राहिलेला आहे त्यामुळे एडवोकेट अजय बुरांडे व आम्ही पूर्णपणे महाविकास आघाडीच्या सोबत असल्याचे त्यांनी नमूद केले यावेळी गणेश वरेकर यांनी शिवसेना ही गाव पातळीवरील कार्यकर्त्यांची मजबूत टीम आहे पूर्ण ताकतीने ती बजरंग सोनवणे यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करेल असे सांगितले तर काँग्रेस पक्षाच्या नेत्या रजनीताई पाटील व अशोक पाटील यांनी बीड जिल्ह्यात सर्वप्रथम काँग्रेस पक्षाचा जिल्हास्तरीय कार्यक्रम घेऊन प्रत्यक्ष उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या समोरच कार्यकर्त्यांना एकजुटीने कामाला लागण्याचे आदेश दिले आहेत अशी माहिती राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजसाहेब देशमुख यांनी दिली आहे यावेळी बोलताना परमेश्वर सातपुते व रत्नाकर शिंदे यांनी शिवसेना ही संपूर्ण जिल्ह्यात महाविकास आघाडीच्या कामात सक्रिय झालेली असल्याचे सांगितले तर देशात सुरू असलेल्या हुकूमशाहीला विरोध करणाऱ्या आम आदमीच्या नेत्यांनी जेलमध्ये जाणे पसंत केले मात्र या सरकारची एकाधिकारशाही सहन केली नाही त्यामुळे आमचे नेते जो आदेश देतील त्या आदेशाप्रमाणे देशातल्या सत्ता परिवर्तनात आम आदमीचा वाटा असल्याचा उल्लेख जिल्हाध्यक्ष अशोक येडे यांनी केला तर शेतकरी कामगार पक्ष हा कायम महाविकास आघाडीचा घटक राहिला आहे त्यामुळे महाविकास आघाडीची जी निश्चित अशी भूमिका ठरेल त्यात आम्ही सहभागी आहोत असा उल्लेख बाळासाहेब घुमरे यांनी केला यावेळी बीड जिल्ह्यातल्या संपूर्ण राजकीय वातावरणाचा विचार करता महाविकास आघाडी ही सशक्तपणे निवडणुकीला सामोरे जात आहे अशी माहिती राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संदीप क्षीरसागर यांनी दिली व पत्रकार परिषदेचा समारोप केला.

------------

## पाटोदा ते साकत रस्त्याच

प्रमाणात असल्याकारणाने साईड पट्ट्या या पूर्णपणे खचल्या असून सध्या तरी सात किलोमीटर अंतर जाण्यासाठी अर्धा तासाचा वेळ लागत आहे. या रस्त्याच्या कामामध्ये दोन नळी पुलाची आवश्यकता आहे.व जुन मध्ये मान्सुन सुरु होण्यापुर्वीं या रस्त्याच्या कामाला सुरुवात करावी, जून पासून पाऊस मोठ्या प्रमाणात होणार आहे. त्या अगोदरच रस्त्याचे काम करून घ्यावे. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा सेवा सोसायटी संचालक सज्जाद सय्यद यांनी केले आहे.

-------------

## लोकसभा निवडणुकीच्या

यात्रा काढण्याची परवानगी मागितली आहे. यापूर्वी विधानसभा निवडणुकीच्या वेळी त्यांना परवानगी नाकारण्यात आली होती. १४४ सीआरपीसी अंतर्गत काढलेला सरसकट आदेश पाहून न्या. भूषण गवई व न्या. संदीप मेहता यांनी आश्चर्य व्यक्त करत असे सरसकट आदेश कसे काढले जाऊ शकतात, अशी विचारणा केली. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने १४४ च्या आदेशासाठी सार्वजनिक शांतता बिघडण्याची सकारण शक्यता असल्याची खात्री असणे आवश्यक असल्याचा निर्णय दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने सरकारला नोटीस जारी करून दोन आठवड्यांत उत्तर मागितले आहे.

---------

## सुरेश धस यांच्यावर

धस व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींवर व इतर आरोपींच्या विरोधात उच्च न्यायालयाच्या आदेशाने गुन्हा दाखल होता. त्यानंतर आरोपीने सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केली होती. ती याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्यानंतर गुन्हा दाखल झाला. सदरील गुन्हा दाखल होऊन जवळजवळ १६ महिने झाले असून, सदरील प्रकरणात संथ गतीने तपास चालू आहे. सदरील तपास उच्च न्यायालयाच्या निगराणीखाली व्हावा अशी याचिका राम खाडे यांनी ॲड. नरसिंह जाधव यांच्यामार्फत दाखल केली आहे. सदरील याचिकेची सुनावणी १५ एप्रिल रोजी औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती मंगेश स. पाटील व न्यायमूर्ती शैलेश पी. ब्रह्मे यांच्यापुढे झाली असता सदरील गुन्ह्यामध्ये तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, उच्च न्यायालयाला सदरील प्रकरणात सात आरोपपत्रं दाखल झाली. अद्याप एक आरोपपत्र दाखल करायचे राहिले असून ते परवानगीसाठी प्रलंबित आहे. मुख्य सरकारी वकील ए.बी. गिरासे यांनी सविस्तर माहिती देण्यासाठी वेळ मागून घेतली. उच्च न्यायालयाने पुढील सुनावणी ३ मे रोजी ठेवली आहे.

-----------

## अशोक चव्हाणांना तुरुंगात टाकण्याचे

केवळ भाजपचे उमेदवारच नाहीत तर भाजपचे राज्यसभेचे खासदारही आहेत. पंतप्रधान मोदीही भाजपला निर्लज्ज मानतात का? चव्हाण यांना लवकरच क्लीन चिट देण्याचा कट रचणार का? भाजपचे राज्यसभा खासदार अशोक चव्हाण यांना तुरुंगात टाकण्याचे आश्वासन ते पूर्ण करणार का?" याबरोबरच मराठवाड्यातील पाण्याची समस्या आणि नांदेड विभागातील रेल्वेची वाईट अवस्था यावरुनही जयराम रमेश यांनी एक्सवरील पोस्टमध्ये भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला.

cmyk

## बीड आकाशवाणीवर जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांची मुलाखत



बीड : बीड आकाशवाणीवर बुधवारी २४ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता ३९ बीड लोकसभा मतदारसंघाच्या जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांची मुलाखत प्रसारित होणार आहे. आकाशवाणी बीड केंद्राच्या १०२.९ मेगाहर्टस्? वर बुधवारी दिनांक २४ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ११ वाजता ही मुलाखात प्रसारित केली जाईल. ही मुलाखात आकाशवाणीचे निवेदक गोपाल ठाकूर घेणार आहेत. ३९ बीड लोकसभा मतदार संघात निवडणुकीविषयक प्रशासनाने केलेली तयारी. अधिकाधिक मतदान व्हावे, यासाठी जिल्हा प्रशासन म्हणून राबवत असलेले विविध जागृतीपर उपक्रमांची माहिती या मुलाखतीत जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी देतील. बीड आकाशवाणीवरून प्रसारित होणारी ही मुलाखत मतदारांनी ऐकावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....



# राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांनी महामार्ग खोदण्याची परवानगी न दिल्याने पाण्याअभावी महिलांचा जीव धोक्यात

**माजलगाव । प्रतिनिधी**

शासनाच्या वतीने ग्रामीण स्तरावर जल जीवनाच्या अनेक मोठ्या योजना राबविल्या जात आहेत.अनेक ठिकाणी जलजीवन व जलस्वराज्य योजना यशस्वीपणे देखील सुरू करण्यात आल्या आहेत. परंतु माजलगाव तालुक्यातील सोमठाणा या गावात या सर्वांच्या विपरीत भयानक चित्र पाहायला मिळत आहे.गोदावरी नदी आणि बंधारा पायथ्याशी असताना तसेच गावात जलस्वराज्याची योजनाही अखंडपणे चालू असताना यामध्ये राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांचे सुस्त आणि हलगर्जीपणाचे धोरण गावातील लहान बालकांचे आणि महिलांचे जीव धोक्यात घालायला विनाकारण मजबूर करत आहे. कारण मागील दोन महिन्यापूर्वी जेव्हा राष्ट्रीय महामार्गाखालून येणारी जलवाहिनी फुटली असता अनेक वेळा तक्रार आणि निवेदन देऊनही अधिकारी काही लक्ष द्यायला तयार नसल्याने गावातील महिलांना सुमारे अर्धा किलोमीटर दूरवरून रात्री बे रात्री आणि विंचू काडीची पर्वा न करता पाणी आणण्यासाठी जावे लागत आहे.यामुळे अप्रिय घटना व दुर्दैवी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांनी लवकर याकडे लक्ष न दिल्यास संतप्त गावकरी मोठे लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत.भर उन्हाळ्यात ढालेगाव बंधरा उशाला आणि कोरड घशाला अशी म्हणण्याची वेळ गावकऱ्यावर आली आहे.याकडे सुस्त राष्ट्रीय महामार्ग अधिकारी व अभियंता लक्ष घालतील का? फुटलेली जलवाहिनी दुरुस्त करून देतील का? हे पहावे लागेल कारण सोमठाणा ग्रामपंचायत विनापरवाना राष्ट्रीय महामार्ग खोदू शकत नाहीत आणि गावकऱ्यांना पाण्याविना तडपतानाही पाहू शकत नाहीत अशी त्यांची अवस्था झाली आहे.



मागील दीड महिन्यात राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांशी दोन ते तीन वेळा पत्र व्यवहार करून जलवाहिनी दुरुस्तीसाठी परवानगी मागितली परंतु त्यांच्याकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही.यामुळे गावकऱ्यांच्या रास्त असणाऱ्या रोषाला सामोरे जावे लागत आहे.म्हणून संबंधित अधिकाऱ्याने लवकरात लवकर यंत्रणा पुरवावी.

– तुळशीदास शेंडेकर ( ग्रामसेवक सोमठाणा,ता. माजलगाव)

राष्ट्रीय महामार्ग कार्यालयात संपर्क साधला असता व राष्ट्रीय महामार्गाच्या खाली फुटलेली जलवाहिनी दुरुस्त करण्याची परवानगी मागितली असता परवानगी नाकारण्यात आली तसेच विनापरवाना महामार्ग खोदल्यास तुमच्यावर गुन्हे दाखल करू अशी दमदाटी करण्यात आली.परंतु महिलांचे होणारी कुचंबना पाहावत नसल्याने मनाला वेदना होत आहे. म्हणून लवकरात लवकर हा प्रश्न निकाली नाही लागला तर गावकऱ्यांना सोबत घेऊन राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांच्या विरोधात लोकशाही मार्गाने आंदोलन करावे लागेल.याची त्यांनी नोंद घ्यावी.

– बिस्मिल्ला खान ( सरपंच, सोमठाणा / अडोळा )

## सुपरस्टार चित्रपट कलावंत विश्वजित पोटभरे मुंबईहुन मित्राच्या भेटीसाठी; जेथलिया हॉस्पिटलला भेट

**माजलगाव । प्रतिनिधी**

माझे प्रिय मित्र बाबुरावजी पोटभरे साहेब यांचे दोन्ही चिरंजीव अभिजित बाबुरावजी पोटभरे व चित्रपट कलावंत सुपरस्टार, अनेक मालिका,नाटक, चित्रपटात चमकलेला हिरो ,डाॅ ऋषिकेश यांचा बेंच मित्र(वर्ग) विश्वजित पोटभरे या दोन्ही बंधुनी डाॅ ऋषिकेश जेथलिया यांच्या जेथलिया हाॅस्पिटल माजलगाव व सिध्देश्वर मेडिकल ला सदिच्छा भेट दिली.भेट घेऊन खुप खुप शुभेच्छा दिल्या.ऋषिकेश व विश्वजित आठवणीत रंगुनी गेले.



त्यांचे जेथलिया हाॅस्पिटल व जेथलिया परिवाराच्या वतीने डाॅ ऋषिकेश जेथलिया यांनी शाल व शिवराय, जिजाऊ यांची पुस्तक भेट देऊन हृद्य सत्कार केला.चळवळतील बाबुरावजी पोटभरे साहेब यांच्या बदल च्या विविध जुन्या आठवणींना संतोषबापु जेथलिया यांनी उजाळा दिला.पोटभरे साहेबांचे चळवळीतील योगदान गेली चाळीस वर्षे मित्र म्हणून पाहतोय अशा भावना संतोषबापु जेथलिया यांनी व्यक्त केल्या.

दोन्ही बांधवांना भावी आयुष्यासाठी जेथलिया हाॅस्पिटल परिवाराच्या वतीने खुप खुप शुभेच्छा दिल्या.माझ्या वतीने खुप खुप शुभेच्छा दिल्या.

## पंधराव्या शिवार साहित्य संमेलनाचे प्रसिद्ध साहित्यिक आसाराम लोमटे यांच्या हस्ते उद्घाटन

**माजलगाव । प्रतिनिधी**

मराठवाडा साहित्य परिषद शाखा माजलगाव च्या वतीने आयोजित १५ व्या शिवार साहित्य संमेलनाचे उद्घाटन, परभणी येथील प्रसिद्ध साहित्यिक तथा पत्रकार आसाराम लोमटे यांच्या हस्ते ना.धो.महानोर साहित्य नगरी मध्ये दिनांक २३ एप्रिल मंगळवार रोजी होणार आहे.

माजलगाव शहरापासून जवळ असलेल्या फुले पिंपळगाव शिवार नवीन मोंढ्याच्या पाठीमागे स्वागत अध्यक्ष तथा पत्रकार जगदीश पोफळे यांच्या शेतात ना. धो.महानोर साहित्य नगरी कडे सकाळी आठ वाजता ग्रंथदिंडीचे प्रयान होईल.ह.भ.प.रामराव महाराज फुलगे यांच्या हस्ते यावेळी ग्रंथाचे पूजन होणार आहे. पंधराव्या शिवाय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रसिद्ध नाटककार व चित्रपट दिग्दर्शक तथा माजलगावचे भूमिपुत्र प्रा.डॉ. अनिलकुमार साळवे यांच्या उपस्थितीमध्ये प्रसिद्ध साहित्यिक तथा पत्रकार आसाराम लोमटे, (परभणी) यांच्या हस्ते सकाळी ९.३० वाजता शिवार साहित्य संमेलनाचे उद्घाटन होईल.यावेळी शिवार साहित्य संमेलनाचे पूर्व




अध्यक्ष राही फपाळ,स्वागत अध्यक्ष जगदीश पोपळे,मसाप शाखा माजलगाव चे पदाधिकारी यांची व्यासपीठावर उपस्थित असेल.सकाळी ११.३० वाजता कथाकथनाचे दुसरे सत्र सुरू होईल.प्रसिद्ध कथाकार विलास सिंदगीकर यांच्या बहारदार कथाकथनाच्या या कार्यक्रमाप्रसंगी अखिल भारतीय साने गुरुजी कथामला चे कोषाध्यक्ष,कांतराव गाजरे हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित असतील.दुपारी १.०० वाजता च्या भोजन सत्रा नंतर, कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून प्राध्यापक संगीता जाधव यांच्या अध्यक्षतेखाली, दुपारी २.०० वाजता ते सुरू होईल.यावेळी माजलगाव तालुक्यातील अनेक मान्यवर कवींच्या कवितांचे सादरीकरण होईल,तर सायंकाळी ५.०० वाजता संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. अनिलकुमार साळवे यांच्या उपस्थितीमध्ये व समारोप सत्राचे प्रमुख पाहुणे नांदेड येथील प्रसिद्ध साहित्य प्रा.डॉ.वैशाली गोस्वामी यांच्या मनोगता नंतर या शिवार साहित्य संमेलनाचा समारोप होईल.साहित्यिक व साहित्यप्रेमी यांच्यासाठी मेजवानी, ठरणाऱ्या या शिवार साहित्य संमेलनात सहभागी होऊन नागरिकांनी आनंद घ्यावा अशी विनंती स्वागताध्यक्ष जगदीश पोपळे, मराठवाडा साहित्य परिषद शाखा माजलगाव चे अध्यक्ष मुकुंदराज सोळंके,प्रा.स्नेहल पाठक (उपाध्यक्ष),प्रा.डॉ.भाऊसाहेब राठोड (कार्यवाह), किशोर गुंजकर (कोषाध्यक्ष),बाळासाहेब झोडगे (सहकार्यवाह),प्रा.डॉ.उमेश साडेगावकर (सहकार्यवाह) यांच्यासह, कार्यकारणी ने केले आहे.

## वनराईने घेतला शाश्वत ग्राम विकासाचा ध्यास

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील शेरी बु येथे वनराई संस्थेचे अध्यक्ष रविंद्र धारिया आले असता त्यांचा ग्रामस्थांच्या वतीने सरपंच संदिप खाकाळ यांनी यथोचित सत्कार केला व त्यानंतर वनराई व एल अँड टी.टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस च्या माध्यमातून नवीन बंधाऱ्याचे भूमिपूजन करण्यात आले. शेरी बु गावाचा विकास होण्यासाठी व शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नती साठी पिक-पाण्यासाठी पावसाळा संपल्यानंतर दुष्काळजन्य परिस्थितीत सुद्धा शेतकऱ्यांना बारामाही पाणी उपलब्ध व्हावे यासाठी वनराई व एल अँड टी. टेक्नॉलॉजी सर्व्हिसेसच्या माध्यमातून वनराई संस्थेचे अध्यक्ष रविंद्र धारिया यांनी जणू काय विडाच उचलला असल्याचे दिसून येत आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर 'गावातील पाणी गावात आणि शिवारातील पाणी शिवारात' हा



**एल अँड टी.टेक्नॉलॉजी सर्व्हिसेसचा मोलाचे योगदान**

वनराई संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व.मोहन धारियांचा स्वप्न प्रत्यक्षात आणण्यावर वनराई संस्थेच्या माध्यमातून सध्या अधिक भर देतांना दिसत आहे. 'वनराई व एल अँड टी.टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस च्या माध्यमातून आष्टी तालुक्यातील शेरी बु या गावांमध्ये पाणलोट व्यवस्थापनाची कामे सुरू आहेत. त्यामुळे त्या गावांमधील भूजल पातळीत वाढ होण्यासाठी पाझर तलाव खोलीकरण, माळरानावर पावसाचे पाणी जमिनीत जिरविण्यासाठी समतल चर खोदून पाणी पातळी वाढविण्यासाठी प्रयत्न करत आहेत यामुळे गावांमधील पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. पाण्याच्या उपलब्धतेमुळे अधिक क्षेत्र लागवडीखाली येणार आहे तसेच मृदा- जल-वन संवर्धन साठी वनीकरण, वृक्ष लागवड करणे, वृक्षतोडीला आळा घालणे, वनसंवर्धनाविषयी जनजागृती करणे असे उपक्रम सुद्धा राबवले जात असून वनीकरणा बरोबरच जलसंवर्धन आणि मृदासंवर्धनाचे कार्य हाती घेतल्याने गावाचा शास्वत विकास करण्यासाठी प्रयत्न करताना दिसत आहेत.यावेळी वनराईचे विश्वस्त सागर धारिया,मंगेश काळे, आकाश शेडगे,प्रोजेक्ट मॅनेजर ज्ञानेश्वर सरडे सर, कृषितज्ज्ञ योगेश मिरपागर,उपसरपंच दिपक सोनवणे, चेअरमन नवनाथ वाघुले,राजू रासकर, प्रदिप बांदल, श्रीराम सोनवणे, तात्या सोनवणे, राहुल गोरे (शक्ती प्रमुख),परशराम शिरोळे, गोरक्षनाथ गोरे सर, कबीर सय्यद, संतोष मेहत्रे,दयानंद भालेकर, परशराम सोनवणे,संदिप सोनवणे सर, किशोर सोनवणे, रवींद्र महाडिक, अक्षय खाकाळ,बाळू खाकाळ,दादा सोनवणे आदी शेतकरी उपस्थित होते

## अंमळनेरचे किराणा मालाचे प्रसिद्ध व्यापारी तथा माजी उपसरपंच सुधाकरआप्पा पवार यांचे निधन

**अंमळनेर । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील अंमळनेर येथील माजी उपसरपंच तथा किराणा मालाचे प्रसिद्ध व्यापारी सुधाकर ( आप्पा ) भानुदास पवार ( ६५ ) यांचे अल्पशा आजाराने अंमळनेर येथील त्यांच्या राहत्या घरी रात्री दुःखद निधन झाले आहे . शांत मनमिळावु व्यक्तिमत्व असलेले सुधाकर पवार यांना गावातील सर्व लहान मुलापासून थोर व्यक्तीपर्यंत आप्पा या त्यांच्या टोपण नावाने ओळखले जायचे . तसेच आप्पांचे सामाजिक , धार्मिक क्षेत्रात मोठे योगदान असायचे . अंमळनेर व अंमळनेर परिसरात आप्पा नावाचे मोठी व्यापारी व्यक्तीमत्व होते . सुधाकर आप्पांचा शांत ,संयमी नेतृत्व म्हणून अंमळनेर परिसरात मोठा बोलबाला असायचा . पूर्वी आप्पांचा तुपाचा व्यवसाय होता. अंमळनेरचे जुने गणेशमंदिर बांधकामासाठी त्यांचा मोठा सिंहाचा वाटा होत. गावात प्रत्येक रविवारी चित्रपट दाखवुन मंदिर बांधकामासाठी निधी उभारण्यासाठी योगदान होते. ग्रामपंचायतीच्या भव्य पटांगणात हा आवाज आला की, चित्रपटाची पेटी आली, वडे आला ,आज पिक्चर होणारच असा निश्चय



मानला जायचा. अंमळनेर प्रसिद्ध तुपाचे व्यापारी म्हणून अहमदनगर येथे त्यांचे नाव झाले होते . अंमळनेर गावचे उपसरपंच म्हणून पाच वर्षे ग्रामपंचायत मध्ये त्यांचा कार्यकाळ राहिला होता . काही वर्षापासून आप्पा हे मधुमेह या आजाराने ग्रस्त होते . तसेच त्यांची सहा महिन्यापासून मधुमेह व बीपी (शुगर ) वाढल्यामुळे तब्येत ढासाळली होती . अचानक १९ एप्रिल रोजी आप्पाचे दुःखद निधन झाले . त्यांच्यावर शोकाकुल वातावरणामध्ये अंमळनेर येथील त्यांच्या शेतात सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले . याप्रसंगी अंमळनेर परिसरातील व्यापारी, ग्रामस्थ , सरपंच, उपसरपंच, सदस्य, पत्रकार, शेतकरी वर्ग , नातेवाईक , मोठ्या संख्येने उपस्थित होते . त्यांच्या पश्चात पत्नी , दोन मुले, नातेवाईक , असा मोठा परिवार आहे . सर्वांच्या वतीने आप्पांना अखेरचा निरोप देण्यात आला व भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली .विषेश म्हणजे गेल्या अनेक वर्षांपासून दै.झुंजारनेता या वर्तमानपत्राचे नियमित वाचक होते. सुधाकर आप्पा यांच्या कुटुंबातील दुखा:त दै.लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

## सुजल पंचभाईची नवोदय विद्यालय येथे निवड

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

२०२४ मध्ये घेण्यात आलेल्या नवोदय विद्यालय प्रवेश निवड परीक्षेचा निकाल जाहीर झाला असुन त्यात अंबाजोगाई तालुक्यातील श्री योगेश्वरी नुतन शाळेचा विद्यार्थी चि. सुजल नागेश पंचभाई याने विशेष गुणवत्ता प्राप्त करत बीड जिल्यातील जवाहर नवोदय विद्यालय गढी येथे निवड झाली आहे.




सुजलची निवड झाल्याने श्री योगेश्वरी नुतनविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असुन या यामुळे सुजलचे सर्वच स्तरातून स्वागत होत आहे. तसेच एन एम एम एस. परिक्षेत जिल्हा गुणवत्ता यादीत गुणांचा उच्चांक मिळवून त्याने यश प्राप्त केले.अंबाजोगाई तालुक्यातून एकमेव नवोदय विद्यालया साठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे शिक्षणाधिकारी तसेच मुख्याध्यापक व शिक्षकांनी स्वागत केले.

## विकासाचा दर असाच कायम राहिला तर आगामी दहा वर्षात भारत महासत्ता बनेल –उदय निरगुडकर

**बीड । प्रतिनिधी**

मागील काही वर्षांमध्ये चीनच्या विकास दर खूप होता मात्र मध्यंतरीच्या काळात त्यांनी लोकसंख्या वाढीवर बंधने घातल्याने आता त्यांची एक पिढी साठीला गेली आहे .त्यामुळे तरुणांची चिन मध्ये वाणवा आहे.भारतात मात्र तशी परिस्थिती नाही त्यामुळे आता भारतात असलेला मोठा तरुण वर्ग हा विविध क्षेत्रात मल्टिपल प्रगती करत असून येत्या दहा वर्षांमध्ये या तरुणांच्या जोरावर आणि विकासाचा दर असाच कायम राहिला तर भारत महासत्ता बनायला वेळ लागणार नाही असे प्रतिपादन झी न्यूज माझी संपादक ज्येष्ठ पत्रकार उदय निरगुडकर यांनी बीड येथील अन्वीता हॉटेलमध्ये पत्रकारांशी संवाद साधताना केले .

भारताच्या भविष्याबाबत चर्चा करताना उदय निरगुडकर म्हणाले की दुसऱ्या महायुद्धात हिरोशिमा आणि नागासाकी या शहरावर बॉम्ब टाकण्यात आले शहर कायमचे उद्ध्वस्त झाले मात्र जपान आणि जर्मनी सारख्या देशांनी आपला विकासदर कायम ठेवत पुन्हा प्रगती केली आज हे देश स्वयंपूर्ण आहेत. यापुढे भारताची स्थिती अशीच राहणार



आहे. भारतामध्ये तरुणांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे .त्यामुळे विविध क्षेत्रात नेत्र दीपक प्रगती झाली आहे .भारतामध्ये काय बनत नाही असा प्रश्न आता राहिला नाही. अलीकडच्या काळामध्ये कोविड चालू असताना तयार केलेली लस किंवा अँटीजंन टेस्ट साठी अल्पकाळात तयार केलेले किट हा त्याचा उत्तम नमुना आहे देशातील तरुणांनी जयपूर फूट असो शेती असो माहिती तंत्रज्ञान असो प्रत्येक क्षेत्रात नेत्र दीपक प्रगती केली आहे या प्रगतीच्या जोरावर भारत येत्या दहा वर्षात महासत्ता होईल. विकासदर जर कायम राहिला तर भारत महासत्ता होण्यास कोणीही रोखणार नाही. जपान आणि जर्मनीचा इतिहास पाहता त्यांचा विकासदर कायम सात ते आठ टक्के दरम्यान राहिला आहे. भारताचा विकास दर सात टक्के जरी कायम राहिला तरी आगामी काळात भारत सर्वच बाबतीत स्वयंपूर्ण होईल कारण या देशांमध्ये तरुणांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे आणि हे तरुणही प्रत्येक क्षेत्रात नेत्र दीपक प्रगती करत आहेत .त्यामुळे या देशात प्रत्येक गोष्टीसाठी वाव आहे. गुंतवणूक असो किंवा काही क्षेत्रातील स्वयंपूर्णता असो या सर्वच बाबतीत आता आपण पुढे आहोत. त्यामुळे येत्या काही दिवसात देश महासत्ता होण्यास काहीच हरकत नाही. यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली. या कार्यक्रमाला व्यापारी महासंघाचे भास्कर जाधव ,रोटरीचे राव, शेटे आदी उपस्थित होते

# पालक हे मुलांच्या जगण्याची प्रेरणा असावे - सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ राजेश इंगोले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकाकडे वेळेचा अभाव आहे, प्रत्येक पालकाला त्याचा मुलगा सुसंस्कारित उच्च विद्याविभूषित ज्ञाणी असावा वाटतो. मग हे साध्य करण्यासाठी पालकांनी ही आपल्या आचार विचारात सकारात्मक बदल घडवून आणून आपल्या मुलांपुढे आदर्श रोल मॉडेल म्हणून उभे राहणे आवश्यक आहे. हा स्वतः मध्ये घडवून आणलेला बदल पाल्यांना आपल्या पालकांकडे पाहून आदर्श जीवन जगण्याची प्रेरणा देत राहील असे मत सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा इंडीयन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे सहसचिव तथा सांस्कृतिक विभागाचे अध्यक्ष माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले.

येथील आई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व प्रशिक्षण क्षेत्रामध्ये अग्रगण्य असलेले आई सेंटर तसेच इंग्लिश विंग्स प्री प्रायमरी स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त तीन दिवसीय शून्य मेडिटेशन कार्यशाळा आई सेंटर, संत सावता माळी नगर, अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आली होती. यामध्ये वय सात वर्ष ते सोळा वर्ष या वयोगटातील विद्यार्थ्यांना



दररोज दोन तास असे एकूण सहा तासाचे ध्यान साधना प्रशिक्षण देण्यात आले व त्यांना रिव्हर्स काउंटिंग च्या माध्यमातून एकाग्रता वाढवण्यासाठी व स्वतःच्या विचारावर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणाकरिता 'सुन्यती इंटरनॅशनल फाउंडेशन' चे संस्थापक व जागतिक ख्यातीचे शास्त्रज्ञ डॉ.लिम सियो जिन (मलेशिया), डॉ..राजेश सवेरा (संचालक, सिफ,पुणे व भारत), प्रा.विनय सोनुळे - केंद्रीय समन्वयक, नागपूर, प्रख्यात आरोग्य तज्ज्ञ तथा 'आई रत्न' डॉ.प्रशांत दहिरे व आई सेंटरचे प्रमुख तथा विश्वविक्रमवीर प्रशिक्षक नागेश जोंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली खास रायपुर - छत्तीसगड येथील अल्का पांडे यांनी विशेष परिश्रम घेत सर्वांशी एकरूप होऊन अगदी सोप्या भाषेत विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या ॲक्टिव्हिटीज करून घेत त्यांना अतिशय उत्साहाने प्रशिक्षित केले. यामध्ये एकूण ५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. या कार्यक्रमाच्या 'रेड बेल्ट' प्रमाणपत्र वितरण सोहळ्यासाठी अध्यक्ष म्हणून नागेश जोंधळे संचालक आई सेंटर प्रो सेंटर हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले व आई सेंटरचे कॉर्पोरेट मॅनेजर तथा प्रशिक्षक अल्का पांडे यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी उपस्थित विद्यार्थी व पालकांना विस्तृत मार्गदर्शन करताना मनाचे डॉक्टर म्हणून सुपरिचित असलेले डॉ.राजेश इंगोले यांनी आपल्या खास शैलीत पालकांशी व विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत त्यांच्या पालकांची भूमिका ही खुप महत्त्वाची असल्याचे सांगत आपण आपल्या पाल्यांसोबत दैनंदिन कामकाजातून वेळ काढून किमान एक तास त्यांच्यासोबत विविध विषयावर गप्पा मारणे, चर्चा करणे व दिवसभरात झालेल्या घडामोडी याविषयी कुतूहलाने विचारणे हे अतिशय महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित केले. पुढे बोलताना डॉ.इंगोले यांनी बदलत्या काळात मुलांना आपल्या भावना आणि विचारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी हे शुन्य ध्यानसाधना तंत्र मदत करेल तसेच कठीण प्रसंगी मनाचा समतोल योग्य निर्णय घेण्यास मदत करेल असा आशावाद प्रकट केला. यावेळी आई सेंटर-प्रो येथे खास उन्हाळी वर्गात स्पोकन इंग्लिश व व्यक्तिमत्व विकाससाठी दोन महिने कालावधीच्या प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा पहिल्याच आठवड्यात ५५० पेक्षा अधिक दैनंदिन जीवनातील वाक्य लिहून व बोलून दाखवल्याबद्दल त्यांचे विशेष कौतुक करत त्यांच्या आत्मविश्वास वाढविण्यासाठी विविध बक्षिसे, शुन्य ध्यानसाधना रेड बेल्ट प्रमाणपत्र विद्यार्थी व त्यांच्या पालकांसह डॉ.राजेश इंगोले व मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली. या पालक विद्यार्थी मेळाव्यात अनेक पालकांनी दैनंदिन जीवनात आपल्या मुलांशी संवाद कसा साधावा, अभ्यास कसा करावा याविषयी अनेक प्रश्न मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांना विचारत त्यांचे सखोल मार्गदर्शन घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशिक्षक प्रतिक गौतम यांनी केले तर आभार प्रदर्शन आई सेंटरचे संचालक नागेश जोंधळे यांनी मानले. हा विद्यार्थी पालक संवाद मेळावा यशस्वी करण्यासाठी सिताराम मनदुमले, प्रियंका चोपडे, पुनम सरदेशमुख, शिवमाला घोडके, महादेव पुदाले, व आई सेंटरच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

cmyk

# आंबा महागला; दरात ३० ते ४० टक्क्यांची वाढ

सध्या आंबा उत्पादक शेतकऱ्यांना चांगले दिवस आले आहेत. कारण आंब्याच्या दरात चांगली वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. नागपूरच्या कळमना फळमार्केटमध्ये आंब्याच्या दरात ३० ते ४० टक्के वाढ झाली आहे. गेल्यावर्षी दक्षिणेतून आलेल्या ज्या आंब्याचा दर ठोकमध्ये ४० रुपये किलो होता. यावेळेस आवक कमी झाल्याने त्याच आंब्याचा दर ६० ते ७० रुपये किलोवर गेला आहे.

अवकाळी पावसामुळं आंब्याचं मोठं नुकसान

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातून नागपूरात आंब्याची आवक होते. त्या भागात झालेल्या अवकाळी पावसामुळं आंब्याची आवक कमी झाली आहे. त्यामुळं दरात वाढ झाली आहे. तसेच महाराष्ट्रात देखील अवकाळी पावसाचा मोठा तडाखा आंबा उत्पादक शेतकऱ्यांना बसला आहे. हाती आलेला घास अवकाळी पावसानं हिरावून घेतल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

विदर्भात मोठ्या प्रमाणात अवकाळी पाऊस

विदर्भात मोठ्या प्रमाणात अवकाळी पाऊस झाला होता. विदर्भातील अकोला, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा या जिल्ह्यांना अवकाळी




पावसाचा तडाखा बसला होता. याठिकाणी लिंबू, आंबा, तसेच भाजीपाला, केळी पिकांना मोठा फटका बसला होता. त्यामुळं शेतकरी चिंतेत होते. यावर्षी आधीच बदलत्या हवामानाचा फटका शेती पिकांना बसला आहे. त्यामुळं आंब्याचं उत्पादन कमी आहे. अशातच पुन्हा अवकाळी पावसानं तडाखा दिल्यामुळं शेती पिकांचं मोठं नुकसान झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

### आंबा उत्पादनात अग्रेसर असणारी राज्ये कोणती?

देशातील अनेक राज्दयात आंब्रयाचं मोठ्म्याया प्रमाणात उत्पादन घेतलं जातं. सर्वात आघाडीवर असणाऱ्या राज्यामध्ये उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश, बिहार, कर्नाटक आणि तामिळनाडू या पाच राज्यांचा समावेश आहे. देशाच्या एकूण आंबा उत्पादनापैकी ६५ टक्के उत्पादन या पाच राज्यात होते. म्हणजे फक्त ३५ टक्के आंब्याचे उत्पादन हे इतर राज्यात घेतलं जातं. महाराष्ट्रात देखील आंब्याचं मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतलं जातं. कोकण विभाग आंबा उत्पादनात आघाडीवर आहे. तसेच पश्चिम महाराष्ट्रासह विदर्भातील काही भागात देखील आंब्याचं मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतलं जातं. दरम्यान, पहिल्या पाच राज्यात महाराष्ट्राचा नंबर लागत नाही. आंबा हा आरोग्याच्या दृष्टीनं देखील खूप फायदेशीर आहे. आंब्यात मुबलक प्रमाणात जीवनसत्ते असतात. त्यामुळं आंब्याच्या हंगामात आहारात मोठ्या प्रमाणात आंब्याचा वापर केला जातो.

# शेतकऱ्यांनो दुधी भोपळ्याचा कडवटपणा घालविण्यासाठी करा हे उपाय



महाराष्ट्रात भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. भाजीपाल्याला बाजारात बाराही महिने मागणी असते. त्यामुळे त्यास बऱ्यापैकी भाव देखील मिळतो. ज्यामुळे शेतकऱ्यांना भाजीपाला पिकांमधुन पारंपारिक पिकांपेक्षा नेहमीच चांगले आर्थिक उत्पन्न मिळते. भाजीपाल्यामध्ये काही शेतकरी हे दुधी भोपळ्याची लागवड करतात. मात्र, भोपळा पीक घेताना त्याच्या चवीबाबत शेतकऱ्यांना सर्वात मोठी समस्या असते. अर्थात शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला भोपळा हा चवीला कडू लागत असेल, तर अशा भोपळ्याच्या उत्पादनानंतर त्यास ग्राहक मिळणे कठीण असते. परिणामी, शेतकऱ्यांनी भोपळा पीक घेताना कोणती काळजी घेतली पाहिजे, जेणेकरून उत्पादित भोपाळ हा कडवट लागत नाही.

भोपळा कडू का लागतो? : कधी-कधी भोपळ्याचे उत्पादन घेताना काही गोष्टींकडे दुर्लक्ष झाल्यास, उत्पादित भोपळा कडू लागतो. यात प्रामुख्याने थंड हवामान असलेल्या किंवा मग समुद्रसपाटीपासून अधिक उंच असलेल्या भागांमध्ये शेतकरी भोपळा उत्पादन घेत असतील. तेव्हा ही समस्या जाणवते. याशिवाय वातावरणातील बदलांमुळे देखील ही समस्या जाणवत असते. यात तापमानात चढ-उतार, भोपळा लागवड केलेल्या जमिनीचा सामू कमी असणे, किंवा मग अचानक भोपळा पिकाला पाण्याच्या ताण पडणे ही प्रमुख कारणे असतात. याशिवाय लागवड केलेल्या जमिनीमध्ये पोषकतत्वे कमी असल्यास, याशिवाय तोडणी केल्यानंतर बाजारात नेईपर्यंत अयोग्य पद्धतीने हाताळणी करणे ही देखील कारणे त्यास कारणीभूत असतात. इतकेच नाही तर सायन्टिफिकदृष्ट्या शेतकऱ्यांनी केलेल्या भोपळयामध्ये कुकुर्बिटासिन या घटकाचे प्रमाण अधिक असेल. तर भोपळ्याला कडवटपणा लागतो.

करा 'हे' महत्वाचे उपाय : भोपळा लागवड करताना शक्यतो मांडव पद्धतीने शेडनेट उभारणे आवश्यक ठरते. ज्यामुळे वातावरणीय बदलाचा परिणाम होत नाही. सामू ५.५ ते ७ पर्यंत असलेल्या जमिनीची भोपळा लागवडीसाठी निवड करावी. भोपळा पिकाला उच्च तापमानाचा फटका बसणार नाही, याची काळजी घ्यावी. याशिवाय लागवडीनंतर काढणीपर्यंत पिकाला पाण्याचा ताण पडू देऊ नये. जमिनीत पोषकतत्वे कमी असल्यास वेळोवेळी खतांची मात्रा द्यावी. काढणीनंतर भोपळ्याची सुयोग्य पद्धतीने हाताळणी करावी. भोपळ्यामध्ये कुकुर्बिटासिनचे प्रमाण कमी राहू नये, यासाठी शेतकऱ्यांनी भोपळ्यास नायट्रोजन खतांचा वापर करणे गरजेचे असते.

# तुम्हीही होऊ शकता ड्रोन दीदी

## पात्रता, लागणारी कागदपत्रे घ्या जाणून

केंद्र सरकार शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबवत आहेत. त्यापैकी एक योजना म्हणजे 'ड्रोन दीदी योजना' होय. या योजनेच्या माध्यमातून सरकारकडून शेतकऱ्यांना अगदी अल्प दरामध्ये आपल्या शेतीमध्ये ड्रोनच्या माध्यमातून फवारणी करता येणार आहे. याशिवाय या योजनेचा मुख्य उद्देश हा शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे तसेच ग्रामीण भागातील महिलांना रोजगार मिळवून देणे, हा आहे. मात्र, आता या योजनेच्या माध्यमातून ड्रोन दीदींची नेमणूक कशी केली जाते? त्यासाठीची पात्रता आहे? ग्रामीण भागातील कोणत्या महिला यात संधी आहेत? याबाबत सविस्तर जाणून घेऊया

'ड्रोन दीदी योजना' ही केंद्र सरकारकडून ३० नोव्हेंबर २०२३ रोजी सुरु करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून देशभरात एकूण १५,००० हुन अधिक महिलांची नेमणूक केली जाणार आहे. निवड झालेल्या या महिलांना १५ दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक असते. ज्यात त्यांना ड्रोन हाताळणी, पिकांवर कशा पद्धतीने फवारणी करायची याबाबत माहिती दिली जाते. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर निवड झालेल्या सर्व ड्रोन दीदींना मासिक १५००० रुपये सानुग्रह अनुदान दिले जाणार आहे.

काय आहे पात्रता?: संबंधित महिला ही बचत गटाची सदस्य असणे आवश्यक आहे. भारताचे नागरिकत्व असलेल्या महिलाच या योजनेसाठी पात्र असणार आहे. कमीत कमी १८ वर्ष वय पूर्ण असावे.

आवश्यक कागदपत्रे :आधार कार्ड, रहिवासी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, ई-मल आईडी, फोन नंबर, बचत गटाचे ओळखपत्र अनिवार्य, पासपोर्ट आकाराचा फोटो

काय-काय फायदे मिळणार?

केंद्र सरकारच्या 'ड्रोन दीदी योजना' योजनेद्वारे निवड झालेल्या महिलांना १५ दिवसांचे प्रशिक्षण दिले जाईल. मासिक १५ हजार रुपये देखील मिळणार आहे. ही त्याच्या मानधनाची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यावर सरकारकडून दिली जाणार आहे. या योजनेच्या केंद्र सरकार प्रामुख्याने देशभरातील १० कोटीहुन बचत गटातील १५ हजार महिलांची निवड करणार आहे. प्रशिक्षण कालावधी पूर्ण झाल्यानंतर संबंधित महिलांना सरकारकडून ड्रोन दिले जातात. या ड्रोनच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मागणीनुसार त्यांच्या शेतात फवारणी करण्याची जबाबदारी या ड्रोन दीदींवर असणार आहे.



## दिन विशेष

### जागतिक दिवस
### भारतीय नागरी सेवा दिन

#### महत्वाच्या घटना

७५३ : रोम्युलस यांनी रोम स्थापन केले. (पारंपारिक तारीख)
१५२६ : मुघल साम्राज्याचे शासक सम्राट अकबर व सुलतान इब्राहिम लोदी यांच्यात पानिपतचे पहिले युद्ध होऊन त्यांत सुलतान इब्राहिम लोदी यांच्या पराभवानंतर दिल्ली येथील सुलतान शाहीचा अंत झाला.
१६६९ : छत्रपती शिवाजी महाराज यांनी समर्थ रामदास स्वामी यांची भेट घेतली.
१७२० : पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ भट्ट यांच्या निधनानंतर त्यांचे पुत्र थोरले बाजीराव पेशवे हे मराठा साम्राज्याचे उत्तराधिकारी बनले
१९३२ : नाशिकच्या काळाराम मंदिराचे दरवाजे सर्वांसाठी खुले ठेवण्याचा आदेश देण्यात आला.
१९४१ : दुसऱ्या महायुद्धा दरम्यान ग्रीस देश जर्मनी देशाला शरण गेला.
१९६० : रिओ दि जानेरो ह्या ब्राझील देशाच्या राजधानीचे उद्घाटन झाले.
१९७२ : 'अपोलो १६' या अमेरिकन अंतराळयानातुन गेलेले जॉन यंग आणि चार्ल्स ड्युक हे अंतराळवीर चंद्रावर उतरले.
१९९६ : भारतीय वायू सेनेचे अधिकारी संजय थापर पॅराशूटच्या साह्याने उत्तर ध्रुवावर उतरले.
१९९७ : भारताचे १२ वे पंतप्रधान म्हणून डॉ. इंद्रकुमार गुजराल (वय ७८ वर्षे) यांनी सूत्रे हाती घेतली. गुजराल हे वयाने ज्येष्ठ असलेले दुसर्या क्रमांकाचे पंतप्रधान आहेत. याआधी मोरारजी देसाई यांनी ८१ व्या वर्षी पंतप्रधानपदाची सूत्र हाती घेतली होती.
२००० : आई वडिलांच्या संपत्तीत परावलंबी विधवेलाही अधिकार असल्याचा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला.
२००७ : वेस्ट इंडीज देशातील क्रिकेट संघाचे महान क्रिकेटपटू ब्रायन लारा यांनी एकदिवसीय क्रिकेट खेळातून निवृत्ती घेतली.

#### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६४ : मॅक्स वेबर जर्मन अर्थशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ (मृत्यू: १४ जून १९२०)
१९०९ : ज.द. गोंधळेकर (जनार्दन दत्तात्रय गोंधळेकर), मराठी चित्रकार.
१९२२ : ॲलिएस्टर मॅकलिन स्कॉटिश साहसकथा लेखक (मृत्यू: २ फेब्रुवारी १९८७)
१९२६ : एलिझाबेथ (दुसरी) इंग्लंडची राणी. प्रदीर्घ कारकिर्दीच्या बाबतीत राणी व्हिक्टोरिया खालोखाल राणी एलिझाबेथचा दुसरा क्रमांक लागतो.
१९३४ : डॉ. गुंथर सोन्थायमर महाराष्ट्र लोकधर्म व मराठी संस्कृतीचे जर्मन अभ्यासक
१९४५ : भारतीय क्रिकेटपटू आणि अंपायर श्रीनिवासराघवन वेंकटराघवन यांचा जन्म.
१९५० : शिवाजी साटम अभिनेते
१९५० : भारतातील प्राख्यात किराणा घराण्यातील हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचे गायक पंडित उपेंद्र भट यांचा जन्मदिन.


#### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५०९ : हेन्री (सातवा) इंग्लंडचा राजा (जन्म: २८ जानेवारी १४५७)
१९१० : मार्क ट्रोन विख्यात अमेरिकन विनोदकार आणि कादंबरीकार (जन्म: ३० नोव्हेंबर १८३५)
१९३८ : सर मुहम्मद इक्बाल पाकिस्तानी कवी, तत्त्वज्ञ आणि राजकीय नेते (जन्म: ९ नोव्हेंबर १८७७)
१९४६ : जॉन मायनार्ड केन्स ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ (जन्म: ५ जून १८८३)
१९५२ : सर स्टॅफोर्ड क्रिप्स इंग्लिश राजकारणी (जन्म: २४ एप्रिल १८८९)
१९६४ : द्रविड चळवळीला चालना देणारे महान भारतीय तमिळ कवी भारतीदासन यांचे निधन.
२०१३ : शकुंतलादेवी गणितज्ञ, ज्योतिर्विद आणि अतिवेगाने आकडेमोड करणारी भारतीय महिला (जन्म: ४ नोव्हेंबर १९२९)

# गुणवत्तापूर्ण पेरुचे उत्पादन मिळवण्यासाठी करा हे उपाय

पेरू हे पंजाबमधील मोसंबीनंतरचे दुसरे महत्त्वाचे फळपिक आहे. हे फळपिक क्षारयुक्त आणि अल्कधर्मी जमिनीतही चांगले येते. पंजाब राज्यातील एकूण फळ उत्पादनात १२.८% वाटा पेरुचा आहे. शिवाय इतर फळपिकांच्या तुलनेत या फळपिकाच्या लागवडीचा खर्च सुद्धा कमी आहे.

पंजाबमध्ये पेरुची प्रामुख्याने दोन पिके घेतात: पावसाळी पीक (जुलै-ऑगस्ट) आणि हिवाळी हंगामातील पीक (नोव्हेंबर-जानेवारी). पावसाळी पिकांची फळे सामान्यत: चवीला रूक्ष असतात आणि त्यांची शेल्फ लाइफ खराब असते. तसेच या पिकावर फळमाशी व करपा रोगाचा प्रादुर्भाव जास्त आढळतो. हिवाळी हंगामातील पिकांची फळे आकार, दर्जा, चव आणि सुगंधाने श्रेष्ठ असतात आणि कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी असतो, त्यामुळे बाजारात त्यांना जास्त भाव मिळतो.



मार्च-एप्रिलमध्ये मोठ्या प्रमाणात होणाऱ्या फ्लशमुळे, पावसाळी हंगामातील पेरुला भरपूर फुले येतात, तर हिवाळी हंगामातील पेरुला कमी प्रमाणात फुले येतात. अतिवृष्टीमुळे पावसाळी पेरुचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते त्यामुळे उत्पादकांना कमी भाव मिळतो. त्यामुळे पावसाळी हंगाम वगळून त्यावेळी योग्य नियोजन केल्यास हिवाळी हंगामातील पेरुचे गुणवत्तापूर्ण फळे मिळू शकतात. छाटणी : पावसाळी पिकांना फुले येऊ नयेत म्हणून २० ते ३० एप्रिल दरम्यान २० किंवा ३० सें.मी. शेंड्याची छाटणी करावी. सिंचन रोखणे : एप्रिल-मे दरम्यान झाडाला पाणी न दिल्यास पावसाळी पिकातील फुलांची गळती होतात. हिवाळी हंगामातील पिकांसाठी ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये जास्तीत जास्त फुले येणे गरजेचे असते, यासाठी जून महिन्यात झाडाला योग्य प्रकारे सिंचित करावे आणि शिफारशीत रासायनिक खते आणि शेणखत द्यावे. यामुळे जुलै ऑगस्ट मध्ये झाडाची चांगली वाढ होते. मोहर गळ करणे : पावसाळी हंगामात फळे लागू नये पेरुच्या झाडावरील मोहर काढला जातो. लहान शेत असेल तर फुले हाताने देखील काढली जाऊ शकतात परंतु मोठ्या शेतात व्यावसायिक लागवडीमध्ये ते कष्टदायक आणि वेळखाऊ असते. मोठ्या प्रमाणात लागवडीसाठी, १०% युरिया (१० किलो युरिया १०० लिटर पाण्यात) किंवा ६०० पीपीएम एनए (नॅफ्थालीन ॲसिटिक ॲसिड) (६० ग्रॅम एनएए १५०-२०० मिली अल्कोहोलमध्ये विरघळवून १०० लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करून झाडावर फवारणी करावी. मे महिन्यात जेव्हा जास्त प्रमाणात मोहर आलेला असतो तेव्हा ही फवारणी करावी.

फळांना आच्छादित करणे : पंजाब कृषी विद्यापीठाने पावसाळी फळे झाकण्यासाठी पांढऱ्या न विणलेल्या पिशव्या वापरण्याची शिफारस केली आहे. परिपक्व हिरव्या कडक फळांना जूनच्या अखेरीपासून जुलैच्या मध्यापर्यंत (रंग तुटण्याच्या अवस्थेत) झाकण्यासाठी पिशवीचा वापर केल्याने फळमाशीच्या प्रादुर्भावापासून तसेच पक्षांपासून फळांचे संरक्षण होते, त्यामुळे फळाच्या सालीचा रंग सुधारतो. बॅगबंद फळांना बाजारात चांगला भाव मिळतो.

फळमाशी सापळ्यांचा वापर : इको-फ्रेंडली फ्रूट फ्लाय सापळे बसवून फळमाशीच्या प्रादुर्भावाचे व्यवस्थापन केले जाऊ शकते. या सापळ्यांमध्ये फळातील माशीच्या नरांना आकर्षित करण्यासाठी फेरोमोन्स असतात जे त्यांच्या नैसर्गिक जीवनचक्रात व्यत्यय आणतात. फळ माशांच्या संख्येचे व्यवस्थापन करण्यासाठी जुलैच्या पहिल्या आठवड्यात फळमाशी सापळे १६ सापळे/एकर याप्रमाणात लावावेत. इतर उपाय : फळमाशी प्रादुर्भावीत फळे नियमितपणे काढून जमिनीत खोल खड्यात पुरावी. उन्हाळ्यात चांगली नांगरणी केल्याने ४-६ सेमी खोलीवर जमिनीत असलेल्या फळमाशीच्या अळ्या बाहेर पडतात व त्यांचे नियंत्रण होते. वरील सर्व उपायांचा अवलंब केल्यास उत्तम दर्जाची पेरू फळे मिळतात, आणि यातून चांगले चांगले आर्थिक उत्पन्न सुद्धा मिळू शकते. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी सुद्धा या उपायांचा अवलंब करण्यास हरकत नाही.

# बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त तीन दिवसीय शून्य मेडिटेशन कार्यशाळा

## पालक हे मुलांच्या जगण्याची प्रेरणा असावे- डॉ इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकाकडे वेळेचा अभाव आहे, प्रत्येक पालकाला त्याचा मुलगा सुसंस्कारित उच्च विद्याविभूषित ज्ञाणी असावा वाटतो. मग हे साध्य करण्यासाठी पालकांनी ही आपल्या आचार विचारात सकारात्मक बदल घडवून आणून आपल्या मुलांपुढे आदर्श रोल मॉडेल म्हणून उभे राहणे आवश्यक आहे. हा स्वतः मध्ये घडवून आणलेला बदल पाल्यांना आपल्या पालकांकडे पाहून आदर्श जीवन जगण्याची प्रेरणा देत राहील असे मत सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले.क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त तीन दिवसीय शून्य मेडिटेशन कार्यशाळेत बोलत होते.

येथील आई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व इंग्लिश विंग्स प्री प्रायमरी स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त तीन दिवसीय शून्य मेडिटेशन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.यामध्ये वय सात वर्ष ते सोळा वर्ष या वयोगटातील विद्यार्थ्यांना दररोज दोन तास असे एकूण सहा तासाचे ध्यान साधना प्रशिक्षण देण्यात आले व त्यांना रिव्हर्स काउंटिंग च्या माध्यमातून एकाग्रता वाढवण्यासाठी व स्वतःच्या विचारावर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रशिक्षण



देण्यात आले. या प्रशिक्षणाकरिता 'सुन्यती इंटरनॅशनल फाउंडेशन' चे संस्थापक व जागतिक ख्यातीचे शास्त्रज्ञ डॉ.लिम सियो जिन (मलेशिया), डॉ.राजेश सवेरा,प्रा.विनय सोनुळे, डॉ.प्रशांत दहिरे व आई सेंटरचे नागेश जोंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली खास रायपुर - छत्तीसगड येथील अल्का पांडे यांनी विशेष परिश्रम घेत सर्वांशी एकरूप होऊन अगदी सोप्या भाषेत विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या ॲक्टिव्हिटीज करून घेत त्यांना अतिशय उत्साहाने प्रशिक्षित केले. यामध्ये एकूण ५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.या कार्यक्रमाच्या 'रेड बेल्ट' प्रमाणपत्र वितरण सोहळ्यासाठी अध्यक्ष म्हणून नागेश जोंधळे संचालक आई सेंटर प्रो सेंटर हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले व आई सेंटरचे कॉर्पोरेट मॅनेजर तथा प्रशिक्षक अल्का पांडे यांची विशेष उपस्थिती होती.यावेळी उपस्थित विद्यार्थी व पालकांना डॉ.राजेश इंगोले यांनी पालकांशी व विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत त्यांच्या पालकांची भूमिका ही खुप महत्त्वाची असल्याचे सांगत आपण आपल्या पाल्यांसोबत दैनंदिन कामकाजातून वेळ काढून किमान एक तास त्यांच्यासोबत विविध विषयावर गप्पा मारणे, चर्चा करणे व दिवसभरात झालेल्या घडामोडी याविषयी कुतूहलाने विचारणे हे अतिशय महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित केले. बदलत्या काळात मुलांना आपल्या भावना आणि विचारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी हे शुन्य ध्यानसाधना तंत्र मदत करेल तसेच कठीण प्रसंगी मनाचा समतोल योग्य निर्णय घेण्यास मदत करेल असा आशावाद डॉ इंगोले यांनी व्यक्त केला.

यावेळी आई सेंटर-प्रो येथे खास उन्हाळी वर्गात स्पोकन इंग्लिश व व्यक्तिमत्व विकाससाठी दोन महिने कालावधीच्या प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा पहिल्याच आठवड्यात ५५० पेक्षा अधिक दैनंदिन जीवनातील वाक्य लिहून व बोलून दाखवल्याबद्दल त्यांचे विशेष कौतुक करत त्यांच्या आत्मविश्वास वाढविण्यासाठी विविध बक्षिसे, शुन्य ध्यानसाधना रेड बेल्ट प्रमाणपत्र विद्यार्थी व त्यांच्या पालकांसह डॉ.राजेश इंगोले व मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिक गौतम यांनी केले तर आभार नागेश जोंधळे यांनी मानले. हा विद्यार्थी पालक संवाद मेळावा यशस्वी करण्यासाठी सिताराम मनदुमले, प्रियंका चोपडे, पुनम सरदेशमुख, शिवमाला घोडके, महादेव पुदाले व आई सेंटरच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# चकलांबा पोलिसांची वाळू तस्करावर मोठी कारवाई



बीड । प्रतिनिधी

चकलांबा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी नारायण एकशिंगे यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, गोदावरी नदीपात्रात सुरळेगाव या ठिकाणी एक वाळू भरण्यासाठी वापरले जाणारे लोडर तसेच ट्रॉली सर ट्रॅक्टर हे वाळू भरणे कामी येणार आहे. त्याप्रमाणे ठाणे प्रभारी अधिकारी यांनी सापळा लावून सदर ठिकाणी रेड केली असता माहितीप्रमाणे एक ट्रॉली सह ट्रॅक्टर व लोडर मिळून आले. पोलिसांची चाहूल लागताच ट्रॅक्टर व लोडर वरील ड्रायव्हर पळून जाण्यात यशस्वी झाले. ट्रॅक्टर व लोडर जागीच जप्त करून पोलिसांनी ताब्यात घेतले असून ट्रॅक्टर व लोडर चालक मालकावर कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया चालू आहे.

त्यादरम्यान सुरळे गावाकडे जात असताना बिगर नंबरचा एक हायवा राक्षस भवन ते सुरळेगाव रस्त्यावरती रहदारीस अडथळा होईल अशा पद्धतीने मध्येच उभा राहिलेला मिळून आल्याने त्यास ताब्यात घेऊन पोलीस स्टेशन येथे आणून मोटर वाहन कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल करून पुढील कायदेशीर कारवाई पोलीस करत आहेत.

सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर साहेब, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर साहेब, उप विभागीय पोलीस अधिकारी डॉक्टर नीरज राजगुरू साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी नारायण एक शिंगे, पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर इंगळे, पोलीस कॉन्स्टेबल खटाणे, पोलीस कॉन्स्टेबल सुरवसे पोलीस कॉन्स्टेबल पवळ, पोलीस कॉन्स्टेबल घोंगडे, चालक सानप आदींनी केली.

# छोटेवाडीमध्ये जयभिम महोत्सवास सुरुवात

## जयंतीस उपस्थित राहण्याचे समितीचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त माजलगाव तालुक्यातील छोटेवाडी येथे जयभिम महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवाची सुरुवात शनिवार (दि.२०) एप्रिल रोजी झाडांना पाणी टाकून व स्वच्छता मोहीम राबवून करण्यात आली. एकूण चार दिवस चालणाऱ्या जयभिम महोत्सवात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन महापुरुष युवामंचकडून करण्यात आले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती भारत देशासाह १५२ देशात साजरी होते.त्या अनुषंगाने छोटेवाडी येथे जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

हा जयभिम महोत्सव एकूण चार दिवस साजरा होणार आहे. शनिवारी छत्रपती शिवाजी महाराज चौकातील झाडांना पाणी टाकून स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.यावेळी सरपंच अंगद कटके, माजी सरपंच राजकुमार



**असे होणार कार्यक्रम :** रविवार (दि.२१)एप्रिल रोजी सकाळी १० वाजता महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा, सोमवार (दि.२२) एप्रिल रोजी सकाळी ९ शालेय साहित्य वाटप, सायंकाळी ६ वाजता कॅडल मार्च, मंगळवार (दि.२३) एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता पंचशिल ध्वजारोहण, सकाळी १० वाजता अभिवादन सभा,सायंकाळी ४ वाजता मिरवणूक, रात्री ६ वाजता भोजनदान, रात्री ८ वाजता भिम संगीत रजनी कार्यक्रम होणार आहे.

आब्दल, जिजाऊ अर्बनचे चेअरमन रंजित जाधव, विठ्ठल सोळंके, सर्जेराव कटके, बालाजी इंगळे, पांडुरंग इंगळे, गणेश सोळंके,महादेव उघडे यांच्यासह आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती, महापुरुष युवामंच यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

# मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाच्या वतीने मतदार जनजागृती अभियान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाच्या वतीने तालुक्यातील सातेफळ, जोगाईवाडी, कुंभेफळ, श्रीपतरायवाडी, पोखरी आणि मांडवापठाण गावांमध्ये मतदार जनजागृती अभियान राबवण्यात आले.

मतदार जणजागृती अभियानाच्या माध्यमातून एम. एस. डब्ल्यू. मध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांनी लोकांना मतदान करून आपला घटनात्मक अधिकार बजावण्यासाठी रोड शो द्वारे आवाहन केले.विद्यार्थ्यांनी घोषणा फलक तयार करून गावांमध्ये असणाऱ्या मतदारांना लोकशाहीचे महत्त्व पटवून दिले. लोकशाहीमध्ये निवडणुकीद्वारे नागरिक राजकीय प्रक्रियेत भाग घेऊ शकतात आणि जबाबदार लोकप्रतिनिधींची आणि शासनाची निर्मिती करू शकतात याबाबत संवाद साधला. गेल्या अनेक वर्षांमध्ये सुशिक्षित लोक देखील निवडणूक प्रक्रियेपासून दूर राहतात व मतदान करत नाहीत असे दिसून




आले आहे. याचा विपरीत परिणाम देशाच्या धोरणावर होऊ नये यासाठी सर्व मतदारांनी निवडणुकीमध्ये आपला मताधिकार बजावून लोकशाही प्रति आपले कर्तव्य पार पाडावे असे आवाहन विद्यार्थ्यांनी केले. याचबरोबर मी एक जबाबदार नागरिक आणि मतदार या नात्याने सध्या होऊ घातलेल्या लोकसभेच्या आणि त्यापुढील सर्व निवडणुकामध्ये मतदान करेल व देशातील लोकशाही मजबूत करेल अशा आशयाची शपथ देखील याप्रसंगी मतदारांना देण्यात आली. या जनजागृती अभियानास त्या त्या ग्रामपंचायतीचे सहकार्य या अभियानादरम्यान मिळाले.समाजकार्य महाविद्यालयाच्या वतीने राबविण्यात आलेले मतदार जनजागृती अभियान महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. अरुंधती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आले. महाविद्यालयातील क्षेत्रकार्य पर्यवेक्षकांनी गावामध्ये अभियान राबवण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. प्रकाश जाधव यांनी मतदान जागृती अभियान राबवण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

# नाही रे गटाकडून आहे रे कडे झालेला प्रवास म्हणजे विकसित भारत- डॉ. निरगुडकर

बीड । प्रतिनिधी

भारत स्वतंत्र झाल्यानंतर गेल्या ७५ वर्षात झालेला विकास म्हणजे नाही रे गटाकडून आहे रे गटापर्यंत झालेला प्रवास होय असे मत जेष्ठ पत्रकार डॉ उदय निरगुडकर यांनी मांडले.

बीड येथे सद्भावना मित्र परिवार आणि व्यापारी महासंघ यांच्या वतीने आयोजित पत्रकार आणि व्यापारी बांधवांशी संवाद बैठकीत ते बोलत होते. यावेळी व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष भास्कर जाधव,कार्याध्यक्ष अशोक शेटे आणि सद्भावना चे वाय जनार्धन राव यांनी डॉ निरगुडकर यांचे स्वागत केले.

यावेळी बोलताना डॉ निरगुडकर यांनी अनेक उदाहरणे देत भारत विकसित होत असल्याचे म्हटले.आपल्या वडिलांच्या काळात एक दुचाकी घेण्यासाठी चार चार वर्षे वाट पहावी लागत असे मात्र आज काही तासात चारचाकी गाडीची डिलिव्हरी मिळते,हा विकास झाला आहे.ज्या पिढीने मीटरगेज रेल्वे पाहिली नाही त्या पिढीला अन त्यांच्या पुढच्या पिढीला बुलेट ट्रेन मध्ये बसण्याची संधी मिळाली आहे. आज इंटरनेट च्या माध्यमातून जग हातात आले आहे.

लाखो संधी उपलब्ध झाल्या आहेत,तरुणांच्या हाताला काम मिळाले आहे,भारत हा जागतिक वयोमानानुसार तरुण देश आहे.त्यामुळे इथे मोठ्या प्रमाणात इनोव्हेशन ला वाव आहे.भारतात गेल्या काही वर्षात किमान बाराशे पेक्षा अधिक नवे शोध लागले आहेत असेही त्यांनी म्हटले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार लक्ष्मीकांत रुईकर यांनी केले.कार्यक्रमाला शहरातील पत्रकार आणि व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धनगरवाडी डोईठाण येथे बबन महाराज यांची संगीत रामकथा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील नागतळा येथील गणेशगड व नागनाथ संस्थानचे महंत काशीनाथ महाराज यांच्या १२ व्या.नारळी सप्ताहास धनगरवाडी डोईठाण येथे प्रारंभ झालेला आहे. या सप्ताहात संत मदन महाराज संस्थानचे अध्यक्ष रामायणाचार्य ह.भ.प.बबन महाराज यांची संगीत रामकथा सुरु आहे.साधु संतांच्या आशीर्वादाने आणि महंत काशीनाथ महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली धनगरवाडी येथे दि.१७ ते दि.२४ एप्रिल २०२४ या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व संगीत रामकथा ज्ञानयज्ञ सोहळा सुरु आहे. सप्ताहात टाळ,विणा,पखवाज,ग्रंथ पुजन झाले आहे. या सप्ताहात काकडाभजन, प्रवचन, विष्णु सहस्रनाम, गाथा भजन,दररोज दुपारी २ ते ५ पर्यत बबन महाराज बहिरवाल यांची सुश्राव्य संगीत रामायण कथा, हरिपाठ, हरिकीर्तन होत आहे.

या सप्ताहात अशोक महाराज शास्त्री(हातोला), दयानंद महाराज कोरेगावकर, सोपान महाराज सानप (हिंगोली) यांचे हरिकीर्तन झाले आहेत. ज्ञानेश्वर महाराज तांबे (बुलढाणा), सागर महाराजा बोराटे ( नातेपुते),सोमवार दि.२२ एप्रिल रोजी रात्री अ.भा.वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश महाराज बोधले यांचे हरिकीर्तन होणार आहे. प्रा.विजय महाराज राजपुरे (धनगरवाडी) यांचे प्रवचन, अशोक महाराज शास्त्री (गोविंदगड,हातोला) यांचे हरिकीर्तन, वशीष्ट महाराज तरटे (जय हरी प्रतिष्ठाण, डोईठाण) यांचे प्रवचन, दयानंद महाराज कोरेगावकर (कोरेगाव) कर्जत यांचे हरिकीर्तन, हरी महाराज शास्त्री ऋषीकेश (कारखेल बु.) यांचे प्रवचन, सोपान महाराज सानप (भागवताचार्य, हिंगोली) यांचे हरिकीर्तन विश्वनाथ महाराज ननवरे रामायणाचार्य, अरणगांव यांचे प्रवचन तर ज्ञानेश्वर महाराज तांबे (बुलढाणा) यांचे हरिकीर्तन झाले.आज रविवारी चैतन्य महाराज कुंभार (गहिनीनाथगड) यांचे प्रवचन, सागर महाराज बोराटे (नातेपुते) यांचे हरिकीर्तन होणार आहे.सोमवार दि.२२ एप्रिल रोजी बाबासाहेब महाराज महापुरे (जय हरी प्रतिष्ठाण, अहमदनगर) यांचे प्रवचन तर अखिल भारतीय वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश महाराज बोधले यांचे हरिकीर्तन होणार आहे.मंगळवार दि.२३ एप्रिल रोजी सुदर्शन मुनी महाराज उदासीन (श्री क्षेत्र सुदर्शन आश्रम, शिदेवाडी) यांचे प्रवचन तर मंगेश महाराज वराडे (बुलढाणा) यांचे हरिकीर्तन होईल.बुधवार दि. २४ एप्रिल रोजी नागतळा येथील श्री क्षेत्र नागनाथ देवस्थान व गणेशगड संस्थानचे अध्यक्ष महंत काशीनाथ महाराज यांचे काल्याचे कीर्तन सकाळी १० ते १२ यावेळेत होणार आहे. त्यानंतर महाप्रसाद होईल.

# यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली ग्रंथ आणि ग्रंथालय आहे.- प्राचार्य ढास



नेकनूर । प्रतिनिधी

माऊली विद्यापीठ संचलित प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान कॉलेज,नेकनूर ग्रंथालय विभागाद्वारा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त तीन दिवसाचे ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. दिनांक १६ /४/२०२४ ते १९/४/२०२४ या कालावधीमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थी आणि सामाजिक स्तरावरील युवक-युतींना ह्या ग्रंथ प्रदर्शनाचा लाभ घेण्याचे आहवान प्राचार्य डॉ.ढास डी. के.यांनी केले आहे. कार्यक्रमाची सुरुवात मा. प्राचार्य डॉ. ढास डी. के.यांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करून करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक करत असताना डॉ. ज्योती मगर यांनी ग्रंथ प्रदर्शनाचा उद्देश व ग्रंथ प्रदर्शनाची मांडणी याविषयी माहिती देत असताना, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची ग्रंथाविषयी आवड प्रेम आणि अभिरुची लक्षात घेऊन विविध स्वरूपाचे सामाजिक राजकीय विचारवंताचे ग्रंथ तसेच ललित पुस्तकाचा समावेश या ग्रंथप्रदर्शनात करण्यात आलेले होते . दिनांक १६ /४ /२०२४ रोजी हे ग्रंथ प्रदर्शन विद्यार्थिनी साठी सकाळी १०:०० ते ४:०० या वेळेत खुले होते., दिनांक:१८ /४ /२४ रोजी हे ग्रंथ प्रदर्शन विद्यार्थ्यांसाठी खुले असेल तसेच समाजातील युवक युवतींसाठी हे ग्रंथ प्रदर्शन १९/४/२०२४ रोजी खुले असून ह्या ग्रंथ प्रदर्शनाचा सर्व वाचकांनी विद्यार्थ्यांनी कर्मचाऱ्यांनी, समाजातील वाचक प्रेमी युवक - युवती यांना ह्या ग्रंथ प्रदर्शनाचा लाभ घेता येणार असल्याचे स्पष्ट केले. अध्यक्ष समारोपप्रसंगी प्राचार्य, डॉ. ढास डी. के यांनी डॉ.बी.आर. आंबेडकर यांचे सामाजिक कार्य शैक्षणिक कार्य वाचनाविषयी त्यांना असणारी आवड तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी आपली वाचन अभिरुची व वाचन संस्कृती जोपासणे तसेच स्पर्धा परीक्षा चा अभ्यास करताना जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी ग्रंथालय विभागातील ग्रंथ व संदर्भ ग्रंथचा उपयोग करून आपले भविष्य उज्वल करून घेण्यासाठी महाविद्यालयीन ग्रंथालय ही एक महत्त्वाची गुरुकिल्ली आहे. इत्यादी स्वरूपाचे सखोल असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.मुजावर एस. टी. यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. मातकर व्ही.बी यांनी मानले.याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी व प्राध्यापक शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी समाजातील इतर वाचक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १४० विद्यार्थिनींना मोफत शिलाई मशीनचे वाटप

## उद्योजक बनू पाहणाऱ्या विद्यार्थिनींना बँक अर्थसहाय्य करणार: शाखा व्यवस्थापक सतिष कुमार

बीड । प्रतिनिधी


बारावी पास झाल्यानंतर विद्यार्थिनींचा कल हा फॅशन डिझाईन कोर्स कडे वाढला आहे. उद्योजक बनण्याचा हा सर्वात सोपा मार्ग आहे. उद्योजक बनू पाहणाऱ्या विद्यार्थिनींना कॅनरा बँक अर्थसाह्य करून त्यांचे स्वप्न साकार करण्याचे प्रयत्न करणार आहे असे प्रतिपादन कॅनरा बँक बीड शाखा व्यवस्थापक सतिष कुमार यांनी केले.

येथील देवगिरी प्रतिष्ठान बीड संचलित तुलसी शैक्षणीक समुह बीड यांच्या वतीने दि.२० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता तुलसी इंग्लिश स्कुल बीड येथे मोफत शिलाई मशिन वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन बीड येथे बी. डिझाईन फॅशन डिझाईन या कोर्ससाठी प्रवेश घेतलेल्या १४० विद्यार्थिनींना यावेळी मोफत शिलाई मशीन वाटप करून संस्थेने अनोखा उपक्रम राबविला आहे. याप्रसंगी देवगिरी प्रतिष्ठान बीडचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदिप रोडे,



तुलसी शैक्षणिक समूहाच्या प्रेरणास्थान तुळसाबाई रोडे, कॅनरा बँक बीड शाखा व्यवस्थापक सतिष कुमार, निवृत्त, डिवायएसपी.सी.आर. रोडे, निवृत्त शिक्षणाधिकारी माऊली सोनवणे, श्रावस्ती शि.प्र. व बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अध्यक्ष जालना बाळासाहेब दांडगे, आर.डी.जोगदंड, प्रा.राम गायकवाड, तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय प्राचार्य डॉ. एल.एम.थोरात, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन प्राचार्य डॉ.अशोक धुलधुले, तुलसी इंग्लिश स्कुल बीड प्राचार्य उमा जगतकर, नालंदा कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन प्राचार्य डॉ.शैलेजा पैकेकर, मॉडर्न संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर प्राचार्य ज्योती मोरे, प्रशासकीय अधिकारी डॉ.अस्मिता साळवे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.अंकुश कोरडे यांनी केले. संस्थेने राबविलेल्या विविध उपक्रमाची माहिती त्यांनी यावेळी सांगितली.

याप्रसंगी बोलताना संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे म्हणाले की, तुलसी शैक्षणिक समूहाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जातात. यातून समाजाप्रती आपली नैतिकता आम्ही जोपासत आहोत . गोरगरीब आणि वंचित असलेल्या विद्यार्थिनीं उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत असे सांगत तुम्ही उद्योजक बना यातच माझा आनंद आहे असे प्रा.प्रदिप रोडे यांनी सांगितले. यावेळी विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.जयश्री पवार यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्राचार्य डॉ.अशोक धुलधूले यांनी मानले. यावेळी तुलसी शैक्षणिक समूहातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थिनी यांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मंत्री छगन भुजबळ यांना उमेदवारी लवकर जाहीर न केल्याने ओबीसीच्या पदाधिकाऱ्यांनी केला महायुती सरकारचा निषेध

**बीड । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ना. छगनराव भुजबळ नाशिक लोकसभा लढविणार असल्याची घोषणा केली. मात्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महायुतीच्या सरकारने लोकसभेचे पहिल्या टप्प्यातील मतदान सुरू झाले तरी ना. छगनराव भुजबळ यांची उमेदवारी जाहीर न केल्यामुळे ना.भुजबळ साहेबांनी लोकसभा निवडणुकीतून माघार घेतली आहे. त्यामुळे ना. छगनराव भुजबळ यांची उमेदवारी जाहीर न करणाऱ्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महायुतीच्या सरकारचा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद बीड शाखेच्या वतीने काळ्या फीती बांधून जाहीर निषेध करण्यात आला आहे.



बीड येथील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यासमोर अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांच्या नेतृत्वाखाली एकत्र येत काळ्या फीती बांधून मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि माहिती सरकारचा जाहीर निषेध केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ना. छगनराव भुजबळ यांनी नाशिक लोकसभा लढवावी असे आदेश महायुतीच्या नेत्यांना दिले होते. मात्र ओबीसी नेत्याला कशाला मोठे करायचे? या द्वेशापाई मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महायुतीच्या नेत्यांनी देशातील लोकसभा निवडणुकीचा पहिला टप्पा आला तरी ना. छगनराव भुजबळ यांची उमेदवारी जाहीर केली नाही. मध्यंतरीच्या काळात ओबीसी आरक्षणावर अतिक्रमण होऊ लागल्याने ना. भुजबळ साहेबांनी राज्यात विविध ठिकाणी लाखोंच्या सभा घेऊन या अतिक्रमणाला रोखण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे ओबीसी नेत्याला कशाला मोठे करायचे या द्वेशापाई मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महायुतीच्या नेत्यांनी भुजबळ साहेबांची उमेदवारी मुद्दामहून जाहीर केले नाही. यामुळे ना. छगनराव भुजबळ यांनी लोकसभा निवडणूक लढवणार नसल्याची घोषणा करून लोकसभा निवडणुकीतून माघार घेतली आहे. त्यांच्या या निर्णयाचे देशातील ओबीसी बांधवांनी स्वागत केले असून जळाऊ वृत्तीच्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महायुतीच्या नेत्यांचा जाहीर निषेध नोंदविला आहे. यावेळी समता परिषदेचे शहराध्यक्ष निखिल शिंदे, माळी महासंघाचे युवा जिल्हाध्यक्ष धनंजय काळे यांच्यासह समता परिषदेचे पदाधिकारी आणि समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## तलवाडा येथे बजरंग बाप्पांनी केले डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्यास अभिवादन


गेवराई :- गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला राष्ट्रवादी शरद पवार गटाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे, माजी मंत्री बदामराव आबा पंडित, युवा नेते युद्धजित दादा पंडित, राष्ट्रवादी किसान सेलच्या प्रदेशाध्यक्ष पूजाताई मोरे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# ३९ बीड लोकसभा मतदारसंघ निवडणूक तिसऱ्या दिवशी एक उमेदवारी अर्ज दाखल

### आतापर्यंत चार उमेदवारी अर्ज दाखल

**बीड । प्रतिनिधी**

३९ बीड लोकसभा मतदारसंघामध्ये नामनिर्देशन पत्र सादर करण्याच्या तिसऱ्या दिवशी आज १ उमेदवारी अर्ज दाखल झाला आहे. ३९ बीड लोकसभा मतदारसंघातून आज भारतीय जवान किसान पार्टी( इंडिया) पक्षाचे रामा खोटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.



शुक्रवारी ११ इच्छुक उमेदवारांना २५ नामनिर्देशन पत्राचे वाटप करण्यात आले. तिसऱ्या दिवसापर्यंत एकूण ८० इच्छुक उमेदवारांना १८५ नामनिर्देशन पत्राचे वाटप झाले. ३९ बीड लोकसभा मतदारसघासाठी आतापर्यंत चार उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

३९ बीड लोकसभा मतदारसंघासाठी दि. १८ एप्रिल २०२४ रोजी अधिसूचना जारी करण्यात आली असून २५ एप्रिल २०२४ ही उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे. तर २६ एप्रिल२०२४ रोजी उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात येणार आहे. २९ एप्रिल २०२४ ही अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. सोमवार दि. १३ मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. तर ४ जून रोजी मतमोजणी केली जाईल. निवडणूक आदर्श आचारसंहिता ६ जूनपर्यंत राहील.

# विखेंसाठी थोरातांना पहाटे झोपेतून उठविले होते, शरद पवारांनी सांगितला त्या लोकसभेचा किस्सा

अहमदनगर । प्रतिनिधी

अहमदनगर लोकसभा मतदारसंघात महायुतीचे खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि महाविकास आघाडीचे नीलेश लंके यांच्यात लढत होत आहे. दोघांचाही प्रचार जोरात सुरू आहे. मात्र, प्रचारात राष्ट्रीय, राज्यपेक्षा स्थानिक मुद्देच अधिक चर्चेत आहेत. प्रचार विखे पाटील आणि लंके यांच्याभोवतीच फिरत आहे. दोन्ही बाजूंनी एकमेकांवर आरोपप्रात्यारोप सुरू आहेत. शुक्रवारी रात्री राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची सभा झाली. त्यांनीही आपल्या भाषणात स्थानिक मुद्देच अधिक मांडले. एका निवडणुकीत दिवंगत ज्येष्ठ नेते बाळासाहेब विखे पाटील यांच्यासाठी दिवंगत ज्येष्ठ नेते भाऊसाहेब थोरात यांच्या घरी पहाटे जाऊन भेट घेतल्याचा किस्साही पवार यांनी भाषणात सांगितला.



पवार म्हणाले, विखे पिता-पुत्र माझ्यावर व बाळासाहेब थोरात यांच्यावर टीका करतात, परंतु आम्ही दोघांनी बाळासाहेब विखे यांना मदत केली होती हे मात्र विसरतात. विखे परिवारात माणुसकी नाही. परंतु त्यांच्या परिवाराच्या सार्वजनिक जीवनात आमची काही ना काही मदत त्यांना नक्कीच झालेली आहे. पूर्वी एकदा बाळासाहेब विखे खासदारकीला उभे असताना मी त्यावेळी मुख्यमंत्री होतो. भाऊसाहेब थोरात मदत करतील अशी बाळासाहेब विखे यांना खात्री नव्हती. त्यावेळी मी नगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर होतो. रात्री एक वाजेपर्यंत माझ्या बैठका सुरू होत्या. त्यानंतर हा प्रश्न माझ्यासमोर आला. त्यावेळी मी तातडीने बाळासाहेब विखे यांना माझ्या गाडीत बसवले व आम्ही जोर्वे (ता. संगमनेर) या थोरात यांच्या मूळ गावी गेलो. भाऊसाहेब थोरात यांची पहाटे तीन वाजता भेट घेतली. भाऊसाहेबांना आम्ही झोपेतून उठवले. त्यावेळी बाळासाहेब विखेंनी अंतकरणापूर्वक त्यांची माफी मागितली व थोरात यांनीही त्यांना माफ केले.

### वाटोळे केलेल्या संस्थांची उत्तरे द्या -थोरात

**याच सभेत बोलताना काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी पालकमंत्री विखे यांच्यावर जोरदार टीका केली. मी एका पतसंस्थेला राजाश्रय दिल्याचा त्यांचा दावा असला तरी ते आता तुरुंगात बसले आहेत. चुकीचे काम करणाऱ्यांना आम्ही कधीही राजकीय आश्रय दिलेला नाही. मात्र तुम्ही गणेश कारखाना, राहुरी कारखाना व रावसाहेब पटवर्धन पतसंस्था यांचे वाटोळे केले, त्या प्रश्नांची उत्तरे आधी द्या, असे आव्हान थोरात यांनी विखे यांना दिले. तुमच्या दिवट्या चिरंजीवाने काय कर्तृत्व केले हे सांगावे लागू नये म्हणून शरद पवार व माझ्यावर टीका करून लक्ष दुसरीकडे वळण्याचे तुमचे प्रयत्न आहेत, असा दावाही थोरात यांनी केला.**

# माझ्या शेतात काय पिकते अन् काय विकते? याचा अनुभव पालकमंत्र्यांना आहे

## बजरंग सोनवणे यांचे सडेतोड उत्तर

**केज । प्रतिनिधी**

मी एक शेतकरी पुत्र असून मी माझ्या शेतात काय पिकवतो व काय विकतो ? याचा अनुभव विद्यमान पालकमंत्र्यांना आहे. कारण ते अनेक वेळा माझ्या सोबत माझ्या शेतात आलेले आहेत. असे खणखणीत प्रत्युत्तर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आणि इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बाप्पा सोनवणे यांनी दिले.

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी एका सभेत मी एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेला असून त्याचा मला सार्थ अभिमान आहे. त्यामुळे मी जन्माने शेतकरी पुत्र आहे. आणि शेतकरी पुत्र असल्याने शेतकऱ्यांच्या अडी अडचणी याची माहिती आहे. मी साखर कारखाना चालवीत असून त्यातून शेतकऱ्यांच्या उसाला मराठवाड्यात सर्वाधिक भाव देवून मी त्यांच्या कुटुंबाची व कामगारांना रोजगार उपलब्ध करून दिला. म्हणून मी शेतकऱ्यांचा मित्र देखील आहे. असे एका सभेत बोलताना वक्तव्य करीत सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्मलेल्या भाजपच्या उमेदवार, पालकमंत्री आणि त्यांच्या नेत्यांना गरिब शेतकऱ्याचे सुख दुःख काय समजणार ? असा प्रश्न उपस्थित केला होता. त्यांच्या या प्रश्नाचा दाखला देत पालकमंत्री यांनी बजरंग बाप्पा हे शेतकरी पुत्र असले तरी त्यांच्या शेतात काय पिकते ? याचा शोध घ्यावे लागेल. असे म्हटले. त्याला उत्तर देताना बजरंग सोनवणे म्हणाले की, मी माझ्या शेतात मी काय पिकवतो ? आणि काय विकतो ? याचा प्रत्यक्ष अनुभव विद्यमान पालकमंत्री यांना आहे. कारण आम्ही सोबत काम करीत असताना ते अनेक वेळा माझ्या शेतात आलेले आहेत. त्यामुळे मी कशाची शेती करतोय ? हे त्यांना चांगलेच माहीत आहे.



अशा शब्दात बजरंग बप्पा सोनवणे यांनी पालकमंत्र्यांना उत्तर दिले आहे.

# राम मंदिर भाजपाने बांधलेले नाही

**मुंबई । प्रतिनिधी**

हिंदुत्वाच्या मुद्यावरून उद्धव ठाकरे यांनी भाजपावर जोरदार हल्लाबोल केला आहे. यासोबत त्यांनी भाजपाने राम मंदिर बांधले नसल्याचे म्हटले आहे. भाजपाने आधी रोजी-रोटीबद्दल बोलायला हवे. शेतकरी-महिला-गरीब-तरुण या मुद्यावर की हिंदुत्वाच्या मुद्यावर ते कोणत्या मुद्द्यावर लढत आहेत हे त्यांनी सांगावे? राम मंदिर भाजपाने बांधलेले नाही, हा न्यायालयाचा निर्णय होता.



बाबरी मशीद पाडण्याची जबाबदारी शिवसेनेने घेतली, मुख्यमंत्री म्हणून मी विधानसभेत हिंदुत्वावर बोललो आहे. लोकांना ते माहीत आहे. पण आज माझ्यासाठी सर्वात मोठा मुद्दा हा आहे की, मला मोदी सरकार नाही तर भारत सरकार हवे आहे. जर एकच पक्ष असेल तर ते देशासाठी सर्वात धोकादायक आहे. माझ्या वडिलांच्या काळात एक मजबूत सरकार असावे असे आम्हाला वाटत होते, पण अटलजींनी आघाडीचे सरकार यशस्वीपणे चालवले, नरसिंह राव यांच्या सरकारने आर्थिक सुधारणा आणल्या. आता काळाप्रमाणे देशाला अशा सरकारची गरज आहे जे अनेक पक्षांना सोबत घेईल असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.

उद्धव ठाकरे यांना यावेळी पुन्हा भाजपासोबत जाण्याची काही शक्यता आहे का? असा प्रश्न विचारला असता त्यांनी त्यावर थेट उत्तर दिले आहे. मी असे का करू? माझा एकापेक्षा जास्त वेळा विश्वासघात झाला आहे. माझ्या दृष्टीने भाजपाचा खरा चेहरा उघड झाला आहे असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. तसेच आमचे हिंदुत्व त्यांच्या हिंदुत्वापेक्षा वेगळे आहे. आपले हिंदुत्व घरातील चूल पेटवणार आहे. भाजपाचे हिंदुत्व हे घर जाळणारे आहे.आम्ही मुस्लिमांच्या विरोधात नाही, फक्त देशद्रोही म्हणजेच देशाशी गद्दारी करणा-यांच्या विरोधात आहोत. भाजपा म्हणते चार जाती आहेत तरुण, शेतकरी, महिला आणि गरीब. तरुणांना नोक-या कुठे आहेत? शेतक-याच्या म्हणण्याकडे तुम्ही दुर्लक्ष करता. गृहमंत्री या नात्याने अमित शाह यांना मणिपूरमधील महिलांवरील गुन्ह्यांची माहितीच नव्हती, असे दिसते. तुम्ही गरिबांना गरिबीत ठेवता असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी हल्लाबोल केला आहे.

# सरकारने धनगर समाजाच्या अंगावर भंडारा उधळन्या ऐवजी डोळ्यात टाकला-अशोक हिंगे

**बीड । प्रतिनिधी**

धनगर समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करावा या मागणीसाठी धनगर समाज अनेक दिवसापासून उपोषण आंदोलन करत आहे सरकारमधील भारतीय जनता पार्टीचे अनेक नेते धनगर समाजाला एसटीतून आरक्षण मिळवून देऊच अशी वलग्ना करीत होते मात्र शेवटी सरकारच्या दुर्लक्षितपणामुळे धनगर समाजाच्या नशिबी निराशाच आली सुप्रीम कोर्टाने धनगर आरक्षणाची याचिका फेटाळली हे सर्व सरकारचे अपयश आहे असे प्रतिपादन बीड लोकसभेचे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनी केले.



पुढे बोलताना हिंगे यांनी सांगितले की भोळा भाबडा धनगर समाज रानोमाळ भटकंती करत आपली उपयोजिका भागवत होता धनगर समाज शिक्षणाच्या प्रवाहात नोकरीच्या प्रवाहात यावा म्हणून गेली अनेक दिवसापासून धनगर समाजाचे एसटी प्रवर्गात समावेश करण्यासाठीचे आंदोलन चालू होते उपोषण चालू होते यावेळी सत्तेत असलेल्या भाजपाने आम्ही सत्तेत आल्यावर पहिल्याच बैठकीत आरक्षण देऊ असे म्हणणाऱ्या भाजपने सत्ता येऊन ही धनगर आरक्षण देण्यास टाळाटाळ केली शेवटी धनगर आरक्षणाचे प्रकरण ही न्यायप्रविष्ट झाले धनगड आणि धनगर हा शब्द भेद दुरुस्त करून देण्याचे काम शासनाचे होते मात्र ते काम भाजपा सरकारने केले नाही म्हणून आज सुप्रीम कोर्टानेही धनगर आरक्षणाची याचिका फे टाळी जे मराठा आरक्षणाचे केले तेच धनगर आरक्षणाचे केले त्यामुळे भाजपा सरकार मराठा आणि धनगर समाजाला वापरून घेत होते हेच यावरून दिसून येत आहे त्यामुळे येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत धनगर व मराठा समाजाने भाजपा पुरस्कृत महायुतीच्या नेत्यांना आता त्याची जागा दाखवून देण्याची गरज आहे मराठा आरक्षणात गुलाल उधळून तोंडाला पाने पुसली तर धनगर आरक्षणात भंडारा अंगावर टाकण्याऐवजी डोळ्यात टाकण्याचे काम या सरकारने केले आहे त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत महायुतीला आता जागा दाखवून देण्याची वेळ आली आहे असे मत वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनी केले आहे.

# काँग्रेसच्या वाढत्या लोकप्रियतेचा मोदींना धसका - नाना पटोले

**मुंबई । प्रतिनिधी**

मोदी सरकार घरात घुसून सर्जिकल स्ट्राईक करते असे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी परभणीच्या प्रचार सभेत सांगितले. पण नरेंद्र मोदी चीनला घाबरतात म्हणूनच चीनने भारताच्या सीमेत घुसखोरी करुन जमीन बळकावली, आपले २० सैनिक मारले तरीही नरेंद्र मोदींना आजपर्यंत ते कसे दिसले नाही, असा प्रश्न महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी विचारला आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपाचा समाचार घेत नाना पटोले म्हणाले की, नरेंद्र मोदींनी आज पुन्हा एकदा देशाच्या विभाजनाचा मुद्दा उपस्थित करुन जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. विभाजनाला काँग्रेस जबाबदार असल्याचा मोदींचा आरोप धांदात खोटा आहे. आरएसएसच्या खोटे बोलण्याच्या तालमीत तयार झालेल्या नरेंद्र मोदींकडून वेगळी अपेक्षा करणे चुकीचेच आहे परंतु पंतप्रधान पदावरील व्यक्तीने बोलताना अभ्यास करुन बोलावे अशी अपेक्षा असते. वास्तविक पाहता स्वातंत्र्य चळवळीत भाजपा, जनसंघ अथवा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काहीही योगदान नाही. नरेंद्र मोदी ज्या विचारधारेचे प्रतिनिधित्व करतात तेच लोक मुस्लीम लीगबरोबर सरकारमध्ये सहभागी होते आणि त्याच परिवारातील संघटनेने द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत मांडला होता, हे पंतप्रधान नरेंद्र मोदींना माहित असायला हवे. पंतप्रधान मोदी चुकीची माहिती देऊन जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत.

मराठवाड्यातील शेतकऱ्यांबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कोरडी चिंता आहे. सोयाबीन, बाजारी, ज्वारी, कापसाच्या पिकाचे महत्व सांगताना या पिकांना भाजपा सरकारच्या काळात भावच मिळला नाही, कवडीमोल भावाने विकावे लागले. मराठवाड्याचा शेतकरी संकटात असताना भाजपा मात्र शेतकऱ्यांना मदत देण्याऐवजी पक्ष फोडण्यात व्यस्त होता आणि आता निवडणुका आल्या की मोदींना शेतकऱ्यांची आठवण झाली. उज्वला गॅस, हर घर नल योजना, पंतप्रधान आवास योजना, मोफत राशन या योजनांचा पाढा मोदींनी वाचला परंतु ५ किलो मोफत धान्य देऊन गरिबांना महागाईच्या खाईत लोटले, उज्वला गॅसच्या नावाखाली गरिबांचे रॉकेल बंद केले व ११०० रुपयांचा गॅसही घेता येत नाही अशा योजनांचा उपयोग काय?

आपण गरिबी पाहिली असल्याने गरिबांसाठी काम करत असल्याचे मोदींनी सांगितले पण मोदींच्या १० वर्षाच्या काळातच देशातील गरिब अधिक गरिब झाला आहे. गरिबाला जगणे कठीण झाले आहे. नरेंद्र मोदी यांनी भाषणात सातत्याने काँग्रेस नावाचा जप केला. काँग्रेस पक्षाला देशभरात मिळत असलेले जनसमर्थन व भाजपाचा पराभव स्पष्ट दिसत असल्याने पराभवाच्या धास्तीने नरेंद्र मोदी भाषणात काँग्रेस नामाचा जप करत आहेत, असा टोलाही नाना पटोले यांनी लगावला.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# निवडूक पवार विरुद्ध पवार नव्हे, मोदी विरुद्ध गांधी:अजित पवार

**पुणे । प्रतिनिधी**

यंदाची लोकसभा निवडणूक पवार कुटुंबीयांमधील लढाई नाही. ही निवडणूक पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राहुल गांधी यांच्यातील लढाई आहे. त्यामुळे यंदाची लोकसभा निवडणूक पवार विरुद्ध पवार अशी नाही तर पंतप्रधान नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी अशी आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी स्पष्ट केले. 'इंडिया टुडे टीव्ही'ला दिलेल्या विशेष मुलाखतीमध्ये ते बोलत होते.

यावेळी अजित पवार म्हणाले की, लोकसभा निवडणूक पवार कुटुंबीयांमधील लढाई नाही. ती नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी अशी आहे.

अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या बारामती



लोकसभा मतदारसंघातून त्यांची चुलत बहिण आणि विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांच्या विरोधात निवडणूक लढवत आहेत. याबाबत बोलताना ते म्हणाले, ''ही निवडणूक पवार कुटुंबीयांमधील लढाई नाही. ती नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी अशी आहे. आम्ही प्रचारात भाजप आणि पंतप्रधान मोदी तिसऱ्यांदा सत्तेवर येण्यासाठी संसदेत खासदार पाठवले पाहिजे, असे सांगतो. आम्ही विकासासाठी मते मागत आहे.''

बारामतीतील मतदारांवर दबाव आणत असल्याच्या आरोपांचाही त्यांनी यावेळी इन्कार केला. जर कोणावर दबाव आणला असेल, तर त्यांना समोर आणा, फोनवरून संभाषण झाले असेल, तर त्यांच्यावर कसा दबाव आणला गेला हे दाखवण्यासाठी रेकॉर्ड दाखवा, असे आवाहनही त्यांनी केले. निवडणुका देशावर कोण राज्य करणार हे ठरवायचे आहे. पंतप्रधान मोदी आणि राहुल गांधी यांच्यातील लढाई आहे.

अजित पवारांना यांनी सुप्रीया सुळे यांच्याविरोधात सुनेत्रा पवार यांना उभे करावे यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दबाव आणल्याचा इन्कारही त्यांनी यावेळी केला. अमित शहा यांनी फक्त निवडक गुणवत्ता असलेल्या उमेदवारांना उभे करण्यास सांगितले. प्रत्येक उमेदवाराचा विजय सुनिश्चित करणे खूप महत्वाचे आहे, असेही ते म्हणाले.

# पुणेकरांना पाणीटंचाईच्या झळा; चार दिवसांमध्ये १३३ तक्रारी

**पुणे । प्रतिनिधी**

उन्हाचा तडाखा वाढल्याने शहरातील सर्वच भागांत कमी-अधिक प्रमाणात पाण्याचा प्रश्न निर्माण झाला असून, सोमवारपासून चार दिवसांत महापालिकेकडे १३३ तक्रारी आल्या आहेत. यामध्ये हडपसर क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतून सर्वाधिक ३० तक्रारी आल्या आहेत. शहराला पाणीपुरवठा करणार्या धरण साखळीतील पाणीसाठा कमी आहे. उन्हाळ्याचे दोन महिने अद्याप बाकी आहेत.

या कालावधीत पाण्याची मागणी वाढते. तसेच बाष्पीभवनाचे प्रमाण अधिक असते. त्यातच महापालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट केल्या गेलेल्या ३४ गावांतील नागरिकांच्या पाणीपुरवठा व्यवस्थेबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी येत आहेत. समाविष्ट गावांत



काही ठिकाणी चार, तीन, दोन दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा केला जात आहे. सूस, म्हाळुंगे, पिसोळी या गावांना चार दिवसांतून तर होळकरवाडी, उरुळी देवाची, फुरसुंगी या गावांना तीन दिवसांतून पाणीपुरवठा होतो. या पार्श्वभूमीवर महापालिकेने पाण्यासंदर्भात तक्रार करण्यासाठी जाहीर केलेल्या क्रमांकावर तक्रारींचा पाऊस पडत आहे. या क्रमांकावर सोमवारपासून १३३ तक्रारी आल्या आहेत. यामध्ये पाणी न येणे, पाणी कमी दाबाने येणे, पाणी लवकर जाणे अशा तक्रारींचा समावेश आहे. यात सर्वाधिक हडपसरमधील ३० आणि नगर रस्ता परिसरातील ११ तक्रारींचा समावेश आहे.

गेल्या वर्षी या गावांत प्रतिदिन १ हजार १८ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात होता. मात्र, यंदा उन्हाचा तडाखा वाढल्याने ही संख्या प्रतिदिन १ हजार २३५ वर नेली होती. त्यानंतरही पाण्याची समस्या तीव्रच आहे. त्यामुळे प्रतिदिन १४०० टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे महापालिका आयुक्तांनी दिले. समाविष्ट गावांतील पाणीपुरवठ्यासंदर्भात आराखडा तयार केला जात असून, तो लवकर पूर्ण करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

अशा आहेत विभागनिहाय तक्रारी

औंध-बाणेर-१९, भवानी पेठ-०२, बिबवेवाडी-०८, धनकवडी-सहकारनगर-११, ढोले पाटील ०३, हडपसर-३०, कसबा पेठ-०५, कोंढवा-येवलेवाडी- १४, कोथरूड-बावधन-०३, नगर रोड- ११, शिवाजीनगर ०३, सिंहगड रस्ता ०५ , वानवडी ०४ , वारजे ०७ आणि येरवडा ०७

# शिक्षण हिच यशाची गुरुकिल्ली - डॉ. संजय तलबार

## पीसीसीओईआर मध्ये राज्यस्तरीय 'टेक्नोवेट-२०२४' स्पर्धा संपन्न

**पुणे । प्रतिनिधी**

आजच्या स्पर्धात्मक जगात, विद्यार्थ्यांनी प्रगत शिक्षणावर आणि कृत्रिम बुद्धिमत्ता व मशीन लर्निंग सारख्या साधनांच्या वापरावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. उच्च तंत्रज्ञानामुळे साधने कितीही वाढली, विकसित झाली तरी निरंतर शिक्षण हीच यशाची गुरुकिल्ली आहे असे मत डॉ. संजय तलबार यांनी व्यक्त केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) मध्ये 'टेक्नोवेट-२०२४' या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन



करण्यात आले होते.

टेक्नोवेट २०२४ मध्ये विविध तंत्रज्ञानावर आधारित बीजीएमआय-व्हॅलोरंट, कॅड ओ क्रिएट, फास्ट अँड फ्यूरियस, आयपीएल लिलाव, एम यू एन, शार्क टँक, टेक-संगम एस्केप रूम, ब्रो कोड, ट्रेझर हंट अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयांतील ५०० हून अधिक स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवला. याचा बक्षीस वितरण समारंभ संजय तलबार यांच्या हस्ते पार पडला.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांनी स्वागत केले. डॉ. सुशांत वाघमारे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. संतोष रणदिवे आणि डॉ. सुशांत वाघमारे यांनी केले. कार्यक्रमास सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व विविध संस्थांचे विद्यार्थी उपस्थित होते.

# संविधान वाचविण्यासाठी महाविकास आघाडीसोबत : ब्रिगेडचे प्रवीण गायकवाड

**पुणे । प्रतिनिधी**

देशातील लोकशाही आणि संविधान टिकविण्यासाठी संभाजी ब्रिगेड लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीसोबत आहे, अशी माहिती संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांनी दिली. लोकसभा निवडणुकीसंदर्भातील संभाजी ब्रिगेडची भूमिका गायकवाड यांनी शुक्रवारी पुणे श्रमिक पत्रकार संघात स्पष्ट केली. ते म्हणाले की, सध्याची देशातील परिस्थिती पाहता देश सुरक्षित राहायला हवा. देशाची घटना, येथील लोकशाही व्यवस्था टिकली पाहिजे. हुकूमशाही आणण्याचा प्रयत्न भाजपचा आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारसरणीनुसार भाजपला हा देश हिंदुराष्ट्र करायचा आहे. मागील लोकसभा निवडणुकीत मी काँग्रेसकडून उमेदवारी मिळविण्याचा प्रयत्न केला होता. आता मात्र सक्रिय राजकारणात माझा उतरण्याचा विचार नाही. तो माझा पिंड नाही, असेही त्यांनी नमूद केले.

महायुतीचे उमेदवार जेथे असतील तेथे आमचा विरोध राहणार आहे. हा आमचा विरोध राजकीय नाही, तर विचारधारेची ही लढाई आहे.



भाजपला मनुस्मृतीवर आधारित रचना पुन्हा देशात आणायची आहे. त्यास आमचा विरोध आहे. त्यामुळे संभाजी ब्रिगेडचे कार्यकर्ते महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा प्रचार करतील. फडणवीस-शिंदे सरकारने मराठा समाजाला दिलेले आरक्षण कायद्याच्या चौकटीत टिकणार नाही, हे मराठा समाजाला समजले आहे. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने लोकसभेच्या प्रचारासाठी गावात येणार्या राजकीय नेत्यांना मराठा समाजातील कार्यकर्त्यांकडून परत पाठविण्यात येत असल्याचेही गायकवाड म्हणाले.

# ..तर उद्योजक आत्मनिर्भर बनतील –राम भट

## प्रदर्शनास तीन हजार नागरिकांनी दिली भेट

**पिंपरी । प्रतिनिधी**

औद्योगिक क्षेत्रातील नागरीकांना टुलींग तंत्रज्ञानाचा प्रसार करावा. जेणेकरून परदेशातून टुलींग मशीन आयात करण्याची वेळ येणार नाही. त्यातून उद्योजक आत्मनिर्भर बनतील. असा विश्वास टाटा मोटर्सचे सप्लाय चेन आणि गुणवत्ता विभागाचे वरिष्ठ महाव्यवस्थापक राम भट यांनी व्यक्त केला.

एनटीटीएफ अॅल्युमिनी असोसिएशन पुणे चॅप्टरच्या वतीने ऑटोक्लस्टर एक्झिबिशन सेंटर येथे आयोजित करण्यात आलेल्या टूलींग एक्स्पोच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी फोक्सवॅगन कंपनीचे उप



महाव्यवस्थापक मनोज पाटील, हिताची अस्टेमोचे संचालक सुधीर गोगटे,अॅल्युमिनी असोसिएशनचे व्यवस्थापकीय संचालक आर राजगोपालन ,अध्यक्ष राजू सामनेकर, सचिव विनोद पट्टण , प्रदर्शनाचे समन्वयक केशव मानगे आदी मान्यवर उपस्थित होते. श्री मनोज पाटील म्हणाले कि, आज मेक इन इंडिया या संकल्पनेनुसार जास्तीत जास्त भारतात उत्पादन निर्मिती वाढली पाहिजेत. मात्र येत्या काही नजीकच्या काळात आयतीचे प्रमाण ३० टक्क्यांनी कमी झाले आहे . म्हणजेच आपल्या देशात टुलींगनिर्मितीचे प्रमाण वाढले आहे.

या प्रदर्शनात टूलिंग संदर्भातील वेगवेगळ्या प्रोफाईल असलेल्या कंपन्या सहभागी झाल्या होत्या. त्यामध्ये प्रामुख्याने टूलिंग इंडस्ट्रीजला लागणारे सॉफ्टवेअर, प्रेस टूल, मोल्ड पार्ट,डाय कार्स्टिंग उत्पादक, कॉम्पोनंट, फिक्चर / गेज /एसपीएम उत्पादक, मशीन मॅन्युफॅक्चर आणि इन्स्पेक्शन इक्विपमेंट उत्पादक अशा ६० कंपन्यांचा सहभाग होता. या प्रदर्शनासाठी मुख्य प्रायोजक म्हणुन हस्को आणि एटीक्यू मेट्रो लाभले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केशव मानगे तर सूत्रसंचालन नंदन प्रभू यांनी केले. तर आभार राजू सामनेकर यांनी मानले.

# माझी शेवटची निवडणूक, या वक्तव्यानंतर आढळराव- कोल्हेंमध्ये जुंपली!

**शिरुर, पुणे । प्रतिनिधी**

माझी यंदाची ही शेवटची निवडणूक आहे, असं भावनिक आवाहन शिरूरमधील अजित पवार गटाचे उमेदवार शिवाजी आढळरावांनी केलं. पण देशाची निवडणूक असताना आढळरावांनी हे मनोरंजक वक्तव्य केलं, यातून त्यांचा मी पणा अधोरेखित झाला, अशी खोचक टीका त्यांचे विरोधक खासदार अमोल कोल्हेंनी केली. मी राजकारणातून निवृत्त होऊ नये, अशी कोल्हेची इच्छा असेल आणि ते भावनिक झाले असतील तर पुन्हा लढेन, असं म्हणत आढळरावांनी कोल्हेंची खिल्ली उडवली.

शिरुर लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार अमोल कोल्हे आणि महायुतीचे उमेदवार आढळराव पाटील हे कायम एकमेकांवर टीका करताना दिसतात. एकमेकांच्या विकास कामांवर प्रश्न चिन्ह उपस्थित करत असतात. कधी कांद्याच्या प्रश्नावरुन टीका केली जाते तर कधी शेतकऱ्यांच्या हमीभावावरुन



टीका केली जाते. मात्र आता प्रचारादरम्यान भावनिक साद घालण्याचा प्रयत्नदेखील सुरु असल्याचं दिसत आहे.

आढळराव पाटील हे स्वत:चं मनोधैर्य वाढवण्याचं काम करत आहेत. सुरुवातीला ते म्हणाले की २०१९ चा बदला घ्यायचा आहे आणि आता ते थेट शेवटची निवडणूक असल्याचं आढळराव पाटील म्हणत आहे. यातून आढळराव पाटलांचा मी पणा दिसून येत आहे. देशासाठी, देशाच्या कल्याणासाठी आणि देशातील प्रश्नांसाठी त्यांना काम करायचं नाही. देशात बेरोजगारीचा प्रश्न आहे. शेतकऱ्यांच्या समस्या आहेत. त्यावर न बोलता थेट माझी शेवटची निवडणूक असल्याचं म्हणून ते लोकांना भावनिक साद घालण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र लोकांना आता ही भावनिक साद महत्वाची नाही त्यांना प्रश्न सोडवणारा नेता हवा आहे, असं अमोल कोल्हे म्हणाले.

आढळराव पाटलांनी अमोल कोल्हेंच्या विधानाची चांगलीच खिल्ली उडवली आहे. अमोल कोल्हे काय विधान करतात आणि त्याला काय उत्तर द्यायचं हा माझा वैयक्तिक प्रश्न आहे. मात्र जर त्यांची इच्छा असेल की मी अजून चार निवडणुका लढवाव्या तर मी अजून लढेन. एवढे वर्ष मी काम केलं आता दुसऱ्याला संधी द्यावी असं मला वाटत आहे मात्र जर माझी शेवटची निवडणुकीचं ऐकून अमोल कोल्हे भावनिक झाले असतील तर मी निवडणूक लढेन, असं आढळराव पाटलांनी स्पष्ट केलं आहे.

# अग्निशमन सेवा सप्ताहाच्या सांगता समारोपावेळी जवानांचे संचलन व प्रात्यक्षिके

**पुणे । प्रतिनिधी**

दिनांक १४ ते २० एप्रिल २०२४ या कालावधीत राष्ट्रीय स्तरावर अग्निशमन सेवा सप्ताह पाळला जातो. मुबंई, डॉकयार्ड येथे जहाजामध्ये लागलेल्या आगीत सन १९४४ मध्ये अग्निशमन दलाचे ६६ जवान शहीद झाले होते. त्यानिमित्त देशपातळीवर १४ ते २० एप्रिल जनजागृतीपर अग्निशमन सेवा सप्ताह म्हणून पाळला जातो.

यानिमित्त पुणे अग्निशमन दलातील अधिकारी व जवानांनी या सप्ताहात शहरातील रुग्णालये, मॉल, शाळा, महाविद्यालये, उंच इमारती तसेच आस्थापना अशा विविध ठिकाणी अग्निविषयक प्रात्यक्षिके तसेच व्याख्याने आयोजित केली होती. आग वा आपत्कालिन परिस्थितीत नागरिकांनी काय करावे, काय उपाययोजना कराव्यात याबाबत प्रात्यक्षिक दाखवत मार्गदर्शन केले. तसेच सप्ताहामध्ये सारसबाग याठिकाणी जनजागृतीपर अग्निशमन साहित्य व कार्यपद्धती विषयी प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाला ही नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला.

सांगता समारोपावेळी अग्निशमन दलामध्ये गेल्या वर्षभरात ज्या अधिकारी व जवानांनी उत्तम कामगिरी केली अशा एकुण २३ जणांचा मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे यांनी सन्मान करत मानचिन्ह व प्रमाणपत्र दिले. ''माझ्या दलातील प्रत्येक अधिकारी व जवान सक्षमपणे कर्तव्य बजावत असल्याने याचा या दलाचा प्रमुख म्हणून मला अभिमान आहे'' असे मनोगत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार स्टेशन ड्युटी ऑफिसर गजानन पाथ्रुडकर यांनी केले.

# कडुस येथे ८० विद्यार्थ्यांना विषबाधा

**राजगुरुनगर । प्रतिनिधी**

कडुस, (ता. खेड) येथील दक्षिणा फाऊंडेशन या खासगी प्रशिक्षण संस्थेत आयआयटी आणि नीट परीक्षेची तयारी करणाऱ्या संस्थेतील ६० विद्यार्थ्यांना जेवणातून विषबाधा झाली आहे. पैकी २० विद्यार्थ्यांना चांडोली (राजगुरुनगर) ग्रामीण रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर दोन विद्यार्थी अत्यवस्थ असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी यशवंतराव चव्हाण रूग्णालयात दाखल करण्यात येणार असल्याचे वैद्यकिय अधीक्षक डॉ पुनम चिखलीकर यांनी सांगितले.

कडुस येथे दक्षिणा फाऊंडेशन संस्थेमार्फत आयआयटी आणि नीट परीक्षेची तयारी करून घेतली जाते. देशभरातील गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षण तथा मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थ्यांसाठी निवास व भोजनाची मोफत व्यवस्था संस्थेकडून करण्यात येते.येथे १८ ते २० वयोगटातील जवळपास ६०० विद्यार्थी, विद्यार्थीनी आहेत.शुक्रवारी (दि १९) दुपारी राजमा आणि रात्री कांद्याची पात व बटाट्याची भाजी खाल्या नंतर शनिवारी पहाटे २ नंतर मुलांना मळमळ, उलट्या होऊ लागल्या असे येथील व्यवस्थापक अनु मलिक यांनी सांगितले.

मुलांना त्रास होऊ लागल्यानंतर कडुस प्राथमिक आरोग्य केंद्रात संपर्क साधण्यात आला. संस्थेच्या निवासी हॉस्टेल मध्ये जाऊन डॉक्टरांनी काही विद्यार्थ्यांना प्राथमिक उपचार सुरू केले. मात्र वीस विद्यार्थ्यांना जास्त त्रास होऊ लागल्याने त्यांना चांडोली ग्रामीण रूग्णालयात दाखल करण्यात आले. उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन पाटील, निरिक्षक राजकुमार केंद्रे, उप निरिक्षक ज्ञानेश्वर राऊत,पोलिस संतोष घोलप , चांडोलीचे उपसरपंच सतीश सावंत, माजी उपसरपंच चिकाशेठ वाघमारे आदींनी रुग्णालयाला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या प्रकृती बाबत माहिती घेतली.

# दुकानातील वाहने विकली मालकाला ११ लाखांचा गंडा

**पुणे । प्रतिनिधी**

जुन्या वाहनांच्या खरेदी विक्रीचे व्यवहार करणाऱ्या दुकानात विश्वासाने दिलेली वाहने मालकाच्या परस्पर विकून त्यामधून आलेली ११ लाख ४ हजार रुपयांची रक्कम स्वत:च्या खात्यात घेऊन अपहार करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी समर्थ पोलीस ठाण्यात भादवि ४२०, ४०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार नोव्हेंबर २०२२ ते ७ सप्टेंबर २०२३ या कालावधीदरम्यान घडला.

जुज्जर शब्बीर रामपुरवाला (रा. एनआयबीएम रस्ता, महंमदवाडी) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी सुरजप्रकाश हरिश्चंद्र गुप्ता-खंडेलवाल (वय ६०, रा. शांती निवास, नेहरू मार्ग, घोरपडी गांव) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरजप्रकाश खंडेलवाल यांचे मंगळवार पेठेतील नरपतगिरी चौकात राज मोटर्स व शांती व्हील्स या दुकानात जुन्या चारचाकी व दोनचाकी वाहनांच्या खरेदी विक्रीचा व्यवसाय करतात. त्यांच्या दोन दुकानात आरोपी रामपूरवाला व्यवस्थापक म्हणून काम करीत होता. फिर्यादीने त्याच्यावर विश्वास ठेवत त्याच्याकडे विक्रीकरिता चार चारचाकी गाड्या आणि ९ दुचाकी सोपवल्या होत्या. आरोपीने त्यांच्या परवानगी शिवाय या गाड्या परस्पर ग्राहकांना विकल्या. त्यामधून मिळालेली रक्कम रोख व ऑनलाईन पद्धतीने स्वीकारून फिर्यादीची ११ लाख ४ हजारांची फसवणूक केल्याचे फिर्यादीमध्ये नमूद करण्यात आले आहे.

cmyk